# सार्वजनिक उपक्रम समिती

## २०१०-२०११

## ( बारावी महाराष्ट्र विधानसभा )

महाराष्ट्र शासनाच्या सन २००७-२००८ च्या हिशेबावरील भारताचे
नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील
"महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ" यांच्याकामकाजा
संबंधातील प्रकरण तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१८ तसेच
"शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित" यांच्या
कामकाजासंबंधातील प्रकरण दोन मधील
परिच्छेद क्रमांक २.२२, २.२.११, २.२.१२,
२.२.१४, २.२.१९, २.२.२२ व २.२.२९
यावरील समितीचा

# सातवा अहवाल

सत्यमेव जयते

दि० ११ ऑगस्ट, २०११ रोजी

( दिनांक १२ ऑगस्ट २०११ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर केला )

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई / नागपूर

# सार्वजनिक उपक्रम समिती

२०१०-२०११

( बारावी महाराष्ट्र विधानसभा )

महाराष्ट्र शासनाच्या सन २००७-२००८ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ" यांच्याकामकाजा संबंधातील प्रकरण तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१८ तसेच "शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण दोन मधील परिच्छेद क्रमांक २.२२, २.२.११, २.२.१२, २.२.१४, २.२.१९, २.२.२२ व २.२.२९ यावरील समितीचा

## सातवा अहवाल

# सार्वजनिक उपक्रम समिती

## (२०१०-२०११)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सदाशिवराव पाटील, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. मधुकर ऊर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) कु. प्रणिती शिंदे, वि.स.स.
(४) श्री. रमेश आनंदराव बागवे, वि.स.स.
(५) डॉ. कल्याण काळे, वि.स.स.
(६) श्री. सुभाष घोटे, वि.स.स.
(७) श्री. विवेकानंद पाटील, वि.स.स.
(८) श्री. विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.
(९) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.
(१०) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.
(११) श्री. बदामराव पंडित, वि.स.स.
(१२) श्री. सुरेश देशमुख, वि.स.स.
(१३) श्री. जयकुमार रावल, वि.स.स.
(१४) श्री. अतुल देशकर, वि.स.स.
(१५) श्री. विजयकुमार देशमुख, वि.स.स.
(१६) श्री. प्रमोद जठार, वि.स.स.
(१७) श्री. राजन विचारे, वि.स.स.
(१८) श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स.
(१९) श्री. महादेव बाबर, वि.स.स.
(२०) श्री. प्रविण दरेकर, वि.स.स.
(२१) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(२२) श्री. चरणसिंग सप्रा, वि.प.स.
(२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.
(२४) श्री. संजय केळकर, वि.प.स.
(२५) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अ. ना. कळसे, प्रधान सचिव,
श्री. सुभाषचंद्र मयेकर, उप सचिव,
श्री. सुधीर वळवी, अवर सचिव (समिती),
श्री. अमरनाथ जोशी, कक्ष अधिकारी.

चबी १२४८—१अ

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** | (सात) |
| एक | **महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (ले.प.अ.२००७ -२००८ )** | |
| | (१) टाळता येण्याजोगा जादा खर्च (परिच्छेद क्रमांक ३.१८) | १ |
| दोन | **"शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित" (ले.प.अ.२००७ -२००८ )** | |
| | (१) लेखापरीक्षणाची व्याप्ती (परिच्छेद क्रमांक २.२२) | १२ |
| | (२) खाजगी विकासकांना वित्तिय सहाय्य (परिच्छेद क्रमांक २.२.११) | १४ |
| | (३) नियोजन (परिच्छेद क्रमांक २.२.१२) | १६ |
| | (४) वर्ष १९९९-२००२ दरम्यान पूर्ण झालेल्या योजना (परिच्छेद क्रमांक २.२.१४) | २० |
| | (५) सेवाकरांची अनियमित प्रतिपूर्ती (परिच्छेद क्रमांक २.२.१९) | २३ |
| | (६) वसुलीच्या दिरंगाईमुळे व्याजाची हानी (परिच्छेद क्रमांक २.२.२२) | २५ |
| | (७) एसआर योजनांच्या अंमलबजावणीत कंपनीची भूमिका (परिच्छेद क्रमांक २.२.२९) | २८ |
| चार | बैठकींचे परिशिष्टे | ३१ |

# प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून महाराष्ट्र शासनाच्या सन २००७-२००८ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ" यांच्या कामकाजासंबंधात प्रकरण तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१८ व "शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधात प्रकरण दोन मधील परिच्छेद क्रमांक २.२२, २.२.११, २.२.१२, २.२.१४, २.२.१९, २.२.२२ व २.२.२९ यावरील समितीचा सातवा अहवाल (बारावी महाराष्ट्र विधानसभा) सादर करीत आहे.

"महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ" यांच्याकडून सादर करण्यात आलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक माहितीवर गृह (परिवहन) विभागाचे प्रधान सचिव, श्री. शैलेशकुमार शर्मा व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. दिपक कपूर, श्री. कुमार माने, महाव्यवस्थापक (भां.व.ख.) श्री. व्ही. व्ही. गायधनी, महाव्यवस्थापक (यं. अ.), श्री. रविंद्र धोंडगे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांची समितीसमोर मंगळवार, दिनांक १४ जून, २०११ रोजी साक्ष नोंदवून घेण्यात आली.

"शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित" यांच्या कडून सादर करण्यात आलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक माहितीवर महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव, श्री. गौतम चटर्जी तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्य अधिकारी श्री. एस. एस. झेंडे, श्री. एस. बी. म्हात्रे, कंपनी सचिव, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प, श्री. डी. आर. हडदरे, मुख्य अभियंता, श्री. आर. बी. संख्ये, उप अभियंता यांची समितीसमोर बुधवार, दिनांक ६ जुले, २०११ रोजी साक्ष नोंदवून घेण्यात आली.

श्री. एस. जी. नायक, उप महालेखाकार, श्री. पी.पी. लोणकर, वरिष्ठ लेखाधिकारी (वाणिज्यिक लेखा) यांनी निमंत्रणानुसार समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते. गृह (परिवहन) विभागाचे प्रधान सचिव, श्री. शैलेशकुमार शर्मा तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, श्री. दिपक कपूर व इतर अधिकारी तसेच गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव, श्री. गौतम चटर्जी तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे

मुख्य कार्य अधिकारी, एस. एस. झेंडे व इतर अधिकारी यांनी साक्षीच्यावेळी समितीला दिलेल्या संपूर्ण सहकार्याबद्दल समिती त्यांचे आभार मानते.

समितीने सोमवार, दिनांक ८ ऑगस्ट, २०११ रोजी झालेल्या बैठकीत, प्रारुप अहवालावर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

**सदाशिवराव पाटील,**
समिती प्रमुख,
सार्वजनिक उपक्रम समिती.

**विधान भवन :**
मुंबई, दिनांक ८ ऑगस्ट २०११

## अहवाल

## " महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ "

### एक : टाळता येण्याजोगा जादा खर्च

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१८ मध्ये " टाळता येण्याजोगा जादा खर्च " या संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, **महामंडळाने पुरवठाकाराचे किंमत वाढीचे दावे नाकारले व वस्तूंची स्थानिक खरेदी केली व त्यामुळे रुपये १.२७ कोटीचा टाळता येण्याजोगा जादा खर्च केला होता.** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (महामंडळ) ॲल्युमिनियम एस्ट्रूडेड सेक्शन्स व ॲल्युमिनियम रोल्ड उत्पादने दिनांक ६ मार्च, २००४ ते ५ मार्च, २००५ व दिनांक ११ मार्च, २००४ ते १० मार्च, २००५ या कालावधीसाठी खरेदी करण्यासाठी (अनुक्रमे आरसी नं. ३६८ व ३९०) हिंडाल्को इन्डस्ट्रीज मर्यादित बरोबर दर करार (आरसी) केले (मार्च २००४) होते. करारामध्ये विहीत करण्यात आले होते की एका तिमाहीसाठी दर कायम राहतील म्हणजेच तिमाहिच्या पहिल्या दिवशी अस्तित्वात असलेले दर त्या तिमाहीसाठी कायम राहतील व तिमाहीमध्ये दरांत सुधारणा झाली तर ते पुढच्या तिमाहीसाठी लागू होणार होती. किंमत वाढीसाठी पुरवठा थांबवायचा नव्हता. संस्थेने एप्रिल, २००४ पासून पुरवठा करण्यात आलेल्या उत्पादनासाठी किंमतवाढ मागितली होती (मार्च २००४) परंतु महामंडळाने संस्थेचा किंमत वाढीचा दावा प्रत्येक उत्पादनाची अलीकडील चालू किंमत सुची व सध्याचे इन्गॉटचे दर हे कागदोपत्री पुरावे सादर केले नाहीत याआधारावर नामंजूर केला होता. किंमतवाढीचा प्रस्ताव न स्विकारल्यामुळे संस्थेने आरसी नं. ३६८ (जून २००५) व ३९० (सप्टेंबर २००४) चा पुरवठा स्थगित केला होता. आधीच्या करारामधील किंमत वाढीच्या प्रस्तावाला अंतिमरुप न देता महामंडळाने पुढील करार (आरसी ९ मे ते नोव्हेंबर २००५ या कालावधीसाठी) सप्टेंबर २००५ मध्ये प्रदान केला होता परंतु आधीचे किंमत वाढीच्या दाव्यांना अंतिमरुप दिले नाही म्हणून पुरवठाकाराने त्या कराराची देखील अंमलबजावणी केली नाही.

लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास (ऑक्टोबर २००७) आले की, कराराच्या तरतुदींनुसार पुरवठाकार किंमत वाढीसाठी पात्र असतांना देखील महामंडळाने किंमत वाढ प्रस्ताव स्वीकारण्यात विलंब केला होता त्यामुळे कंत्राटदराला करारापासून दूर होणे भाग पडले होते. त्यानंतर नोव्हेंबर २००५ ते एप्रिल २००६ या कालावधीत केंद्रीय कार्यशाला, दापोडी (पुणे) व औरंगाबाद येथे जास्त दराने महामंडळाने स्थानिय दराने खरेदी करणे भाग पडले होते. आरसी नं. ९ व स्थानिक दराने खरेदी केलेल्या दरामधील फरकाच्या आधारावर स्थानिक खरेदीवर आरसी नं. ९ च्या दराच्या तुलनेत महामंडळाला रुपये १.२७ कोटीचा जादा खर्च करावा लागला होता.

व्यवस्थापनाने म्हटले (जुलै २००८) होते की, दर वाढीचे दाव्यांना कागदोपत्री पुरवठयांचे पाठबळ नव्हते, महामंडळाने हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करून देखील पुरवठाकाराने पुरवठा बंद करण्याचा हटवादी निर्णय घेतला होता. त्यानंतर जून, २००७ मध्ये निविदा व भांडार समितीने टी ॲन्ड एससी त्यासाठी नेमलेल्या दुस-या समितीच्या शिफारसी स्वीकारुन किंमत वाढ स्विकारली होती.

महामंडळाचे हे उत्तर स्वीकाराहर्र नव्हते कारण टी ॲन्ड एस समिती ऑक्टोबर, २००३ मध्ये गठीत होती व मार्च, २००४ रोजी अस्तीत्वात होती व त्यामुळे पुरवठाकाराचा मार्च, २००४ मधील किंमत वाढीचा दावा तिला स्वीकारता आला असता. त्याशिवाय अॅल्युमिनियम हा एक धातू असल्यामुळे त्यामधील दर वाढीची पात्रता महामंडळ खरेदी भांडार विभागाला बाजारातील किंमती बघून स्वतंत्रपणे ठरविता आली असती. पुरवठाकाराने मागीतलेला वाढीव दर स्वीकारणे फायदेशीर होते व स्थानिक खरेदीवर करण्यात आलेल्या रुपये १.२७ कोटीचा जादा खर्च टाळता आला असता.

ही बाब शासनाला कळविण्यात (मे २००८) आली होती; त्यांचे उत्तर प्रलंबित होते (डिसेंबर २००८)

१.२ यांप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमुद केले की, या अनुषंगाने खालील बाबी विचारार्थ सादर करण्यात येत आहेत :—

(१) अॅल्युमिनीयम रोल्ड प्रॉडक्ट व अॅल्युमिनीयम एक्सट्रुडेड सेक्शन खरेदीसाठी खुली निविदा दि. १५ जुलै, २००३ रोजी मागविण्यात आली होती. सदर निविदेवर खरेदी करण्यासाठीचा प्रस्ताव महामंडळाकडे दि. २३ ऑगस्ट, २००३ रोजी टिप्पणी क्र. १६५९ नुसार सादर करण्यात आला होता. सदरचा प्रस्ताव मा.अध्यक्ष, म.रा.मा.प. महामंडळ यांनी दि. २२ सप्टेंबर, २००३ रोजी मंजूर केला. त्यावेळी दरम्यानच्या काळात महामंडळाकडे निविदा व भांडार समिती अस्तित्वात नव्हती. त्यामुळे निविदा व भांडार समितीस असलेले खरेदीसाठीचे निर्णय घेण्याचे अधिकार संचालक मंडळाकडे आले. जर त्यावेळी नि.व.भा. समिती अस्तित्वात असती तर वरील प्रस्तावावर खरेदीचा निर्णय एका महिन्यात घेण्यात आला असता. सर्वसाधारणपणे नि.व.भां. समिती दरमहा बैठक घेऊन खरेदी संबंधीचें निर्णय घेत असते. त्यामुळे खरेदीबाबतचा निर्णय घेण्यास विलंब झाला.

(२) संचालक मंडळाच्या दि. १४ जानेवारी, २००४ रोजी झालेल्या बैठकीत धंदवाटपाचा निर्णय घेण्यात आला व त्याप्रमाणे खालील पुरवठादारांना स्विकृती पत्र पाठवून बँक हमीपत्रे प्राप्त झाल्यानंतर खालील प्रमाणे दर करार वितरीत करण्यात आले :—

(अ) अॅल्युमिनियम रोल्ड प्रॉडक्ट.— दर करार क्र. ३८९ सन २००३-२००४ दि. २२ मार्च, २००४ मे. हिंडाल्को व दरकरार क्र. ३९० सन २००३-२००४ दि. १८ मार्च, २००४ मे. इंडाल्को यांना दरकरार वितरीत करण्यात आला.

(ब) अॅल्युमिनियम एक्सटुडेड सेक्शन.— दरकरार क्र. ३६८ सन २००३-२००४ दि. २२ मार्च, २००४ मे. हिंडाल्को यांना दरकरार वितरीत करण्यात आला. उपरोक्त नमुद दरकराराची मुदत माहे मार्च, २००५ पर्यंत वैध होती. सदरचे दरकरार मे. हिंडाल्को व मे. इंडाल्को यांचे नांवे वितरीत केल्यानंतर मे. हिंडाल्को या कंपनीने काही कालावधीनंतर मे. इंडाल्को या कंपनीचे मे. हिंडाल्को या कंपनीत विलिनीकरण करून दोन्ही कंपन्या एकाच छत्राखाली, म्हणजे मे. हिंडाल्को या नावांने उदयास आणल्या



(३) दरम्यानच्या काळात, मे. हिंडाल्को यांनी त्यांचे पत्र क्र. १४०३२ दि. १० मार्च, २००४ प्रमाणे दरकरारा संबंधीची कार्यवाही चालू असतांनाच पत्र सादर करून दरवाढीची मागणी केली. मे. हिंडाल्को याची दरवाढीसंबंधीची मागणी कोणत्याही कागदपत्राच्या पुराव्याविना सादर करण्यात आली होती. दरकराराप्रमाणे दरवाढ देण्याची अट खालील प्रमाणे महामंडळाने ठरवून दिली होती :—

(क) निविदेतील दिलेले दर पहिल्या तीन महिन्यासाठी म्हणजे पहिल्या तारखे पासून पुढील ३ महिन्यासाठी कायम राहतील आणि जर काही बदल या काळात झाला तर तो पुढील तीमाहीसाठी लागू होईल.

(ड) पुरवठादाराने सध्याचे प्रत्येक वस्तुंचे दर त्यांच्या मुख्य कार्यालयाकडून महामंडळास सादर करावेत, सदरच्या दराच्या आधारे भविष्यकाळात होणा-या दरवाढ इनगॉट दरातील बदलाप्रमाणे महामंडळ स्विकारेल व त्याप्रमाणे दर मंजूर करण्यात येतील. परंतु, पुरवठादाराने दरवाढीच्या कारणामुळे सामानाचा पुरवठा करणे थांबवू नये.

महामंडळाने मे. हिंडाल्को यांनी मागितलेली दरवाढ दरकरारातील विशिष्ठ शर्तीमुळे स्विकारलेली नव्हती. कारण जर तसे केले असते तर त्यापोटी द्याव्या लागणा-या वाढीव खर्चासाठी लेखा आक्षेप येवू शकला असता, त्यामुळे दरकरारातील अटी व शर्तीनुसार महामंडळाला वस्तुचा पुरवठा करण्याकरिता मे. हिंडाल्को यांचेवर दबाव आणण्याचा निर्णय महामंडळाने घेतला. मे. हिंडाल्कोचे प्रतिनिधी यांना वेळोवेळी महामंडळातर्फे सदरचा प्रश्न चर्चा करून निकाली काढण्यासाठी बोलविण्यात आले. सदर बैठकी दरम्यान दरवाढ देणे महामंडळास शक्य होणार नाही. असे स्पष्ट करत महामंडळ सार्वजनिक उपक्रम संस्था असून दरवाढ देण्यासंबंधीचा निर्णय घेण्यासाठी दरकरारातील अटी व शर्तीनुसार मर्यादा येत आहेत. कारण सदरच्या पहिल्या तिमाहिसाठी दरकरारातील अटी व शर्ती पुरवठादाराने स्विकृत केलेल्या आहेत. परंतु, महामंडळाने केलेल्या वरील प्रयत्नास सकारात्मक यश आले नाही. ब-याच कालावधीनंतर मे. हिंडाल्को यांनी मागणी केलेली दरवाढ न दिल्याचे कारण पुढे करून सामानाचा पुरवठा थांबविण्याचे कडक धोरण स्विकारुन सामानाचा पुरवठा थांबविला.

(४) दरम्यानच्या काळात, महामंडळाने भविष्यकाळातील मागणी लक्षात घेता अॅल्युमिनियम सामानाची गरज भागविण्यासाठी स्थिर दराची खुली निविदा दि. २१ डिसेंबर, २००४ रोजी मागवून उघडण्यात आली. त्यामध्ये अॅल्युमिनियम रोल्ड प्रॉडक्टकरिता मे. हिंडाल्को यांची निविदा प्राप्त झाली. सदरची निविदा उघडल्यानंतर असे आढळून आले की, निविदेतील दिलेले दर अस्तित्वात असलेल्या दरकाराच्या वाढीव दरापेक्षादेखील जास्त होते. त्यामुळे महामंडळाने निविदा व भांडार समिती ठराव क्र. ८०७, दिनांक २० जानेवारी, २००५ अन्वये सदरची निविदा चालू दरकाराची

मुदत संपेपर्यंत (मार्च २००५) स्थगित ठेऊन अस्तित्वात असलेल्या दरकरारानुसार सामानाचा पुरवठा मागविण्यांचा निर्णय घेतला. तथापि, वरील दुसऱ्या निविदेत दिलेले दर हे मागितलेली दरवाढ देऊनही येणाऱ्या दरापेक्षा जास्त असल्याचे आढळून आले. वास्तविक मे. हिंडाल्को हा एकमेव निविदाकार (उत्पादक) खुल्या निविदेमध्ये सहभागी होता. नविन निविदेवर देखील महामंडळाने निर्णय घेऊन दरकारार क्र. ९ सन २००५-२००६ मे. हिंडाल्को यांना दरकरार वितरीत केला. तथापि, मे. हिंडाल्को बरोबर दरवाढीबाबतचा निर्णय महामंडळाने निकाली न काढल्यामुळे मे. हिंडाल्को यांनी दुसऱ्या निविदेत सहभागी होऊन देखील दरकरार स्वीकृत करून सामानाचा पुरवठा न करण्याचे धोरण स्वीकारले.

(५) अशा प्रकारे, मे. हिंडाल्को यांनी सहकार्य न केल्याने महामंडळाला आपल्या धोरणाचा पुनर्विचार करणे भाग पडले व सदरचा विषय पुनश्च तपासणी करण्यासाठी महामंडळाने तत्कालिन वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक (विधी) /महाव्यवस्थापक (भां व ख) यांच्या समितीमार्फत पूर्नतपासणी करण्यात आली. समितीने केलेल्या शिफारसीनुसार सामानाचा सुरळीत पुरवठा होण्याच्या दृष्टीने निविदा व भांडार समितीने एप्रिल, २००६ ते डिसेंबर, २००६ या कालावधीसाठी दरवाढ मंजूर केली. त्याचप्रमाणे महामंडळाने जोखीम खरेदी दावे की जे राज्य परिवहन महामंडळाच्या वेगवेगळया मध्यवर्ती कार्यशाळेतून मे. हिंडाल्को यांचेवर लादलेले माफ करण्यांचा निर्णय घेतला.

मे. हिंडाल्कोने सामानाचा पुरवठा बंद केल्यामुळे नवीन बसगाडया बांधण्यासाठी लागणाऱ्या ॲल्युमिनियम सामानाची गरज लक्षात घेता स्थानिक खरेदी करून गरज भागविण्यात आली.

(६) वरील स्पष्टीकरणावरुन असे दिसून येईल की, महामंडळाच्या कोणत्याही मध्यवर्ती कार्यशाळांमध्ये स्थानिक खरेदी करण्याचा कोणताही हेतू नव्हता. परंतु, त्याच वेळी महामंडळाने सदरचा विषय सामंजस्यपणे निकाली काढण्यासाठी मे. हिंडाल्को यांच्या अधिकाऱ्यांसमवेत वेळोवेळी प्रयत्न केलेले आहेत. तथापि, मे. हिंडाल्को यांचे ॲल्युमिनियम वस्तु पुरवठा करण्याची मक्तेदारी असल्याने त्यांचे सहकार्य न मिळाल्यामुळे महामंडळापुढे मे. हिंडाल्को यांनी विनंती केल्याप्रमाणे दरवाढ देण्याशिवाय अन्य कोणताही पर्याय शिल्लक नव्हता.

**शासकीय लेखा परीक्षण यांनी निदर्शनास आणून दिल्या प्रमाणे स्थानिक खरेदी केल्यामुळे महामंडळाचा अतिरिक्त खर्च रु. १.२७ कोटी झाल्याचे परिच्छेदात नमूद केले आहे. या संदर्भात खालील प्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.**

सन २००३-२००४ या कालावधीत महामंडळास ॲल्युमिनियम रोल्ड व एक्स्टुजन या वस्तूंच्या पुरवठ्यासाठी मे. हिंडाल्को हे एकमेव उत्पादक होते. त्यांची त्या कालावधीमध्ये ॲल्युमिनियम रोल्ड व एक्टूजन च्या मालाच्या पुरवठ्यासाठी मक्तेदारी निर्माण झाली होती.



दरकरार क्र. ३६८, ३८९, ३९० त्यांना दि. २२ मार्च, २००४ रोजी वितरीत करण्यात आले होते. परंतु, मे. हिंडाल्को यांनी सदर दरकरारास दर वाढीसाठी दि. १० मार्च, २००४ पासून मागणी केली होती.

दरकरारातील अटी व शर्तीनुसार मे. हिंडाल्हो यांना दरवाढ अनुज्ञेय नव्हती कारण दरकरारात असे नमूद केले होते की, दरकरार वितरीत केल्यानंतर पहिल्या तीन महिन्यात दर स्थीर रहातील. जी काही दरवाढ होईल ती पुढील तिमाहीसाठी अनुज्ञेय राहील (पुढील येणाऱ्या तीन महिन्यासाठी लागू राहील)

मे. हिंडाल्को यांना नविन दरकरार क्र. ९ जो सप्टें. ०५ या महिन्यात वितरीत करण्यात आला तो त्यांनी स्वीकारला नाही. कारण त्यांचे पूर्वीच्याच दरकरारास दरवाढ मंजूर करण्यात आली नव्हती व तो विषय निकाली निघाल्याशिवाय सदरचा दरकरार न स्वीकारण्याची भूमिका मे. हिंडाल्को यांनी घेतली व ॲल्युमिनियम या वस्तूचा पुरवठा थांबविला.

वर उल्लेख केलेल्या कारणामुळे मे. हिंडाल्को यांनी पुरवठा थांबविल्यामुळे मध्यवर्ती कार्यशाळांनी डिसेंबर, २००५ ते जून, २००६ या कालावधीत कार्यशाळा व्यवस्थापकांना असलेल्या अधीकारात महामंडळ ठराव क्र. ९४५६ अन्वये नियमाधीन राहून खरेदी करणे भाग पडले. महामंडळ ठरावानुसार ज्यावेळी नियमित दरकराराच्या पुरवठादारामार्फत साहित्याचा पुरवठा होत नाही अशा परिस्थितीत बस बांधणीचे उत्पादन सुरू ठेवण्यासाठी खरेदी करण्याचे अधिकार महामंडळाने उपरोक्त ठरावाद्वारे कार्यशाळा व्यवस्थापकांना प्रदान केलेले आहेत.

शासकीय लेखा परिच्छेदात दरकरार क्र. ९ सन २००५-०६ शी तुलना करून अतिरिक्त खर्च झाला आहे असे दर्शविण्यात आले आहे, जो की मे. हिंडाल्को यांनी तत्वतः स्वीकारलाच नाही.

दरकरार क्र. ९ (२००५-०६) हा निविदा व भांडार समितीने ठराव क्र. ८४८ दि. ४ एप्रिल, २००६ नुसार पूर्वलक्षी दरकरार वितरीत केलेल्या तारखेपासून रद्दबातल ठरवीला आहे. सदरचा दरकरार रद्दबातल ठरवीत असताना उच्च न्यायालयाचे कांऊसलर यांचे अभिमत घेतल्यानंतरच रद्द ठरवीला आहे.

सदरच्या अतिरिक्त खर्चाबाबत त्यावेळेस (नोव्हेंबर, २००५ ते जून २००६ या दरम्यान) असलेले ॲल्युमिनियम या धातूचे (Market rate) बाजारभावाचा विचार केला आहे व मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, नागपूर येथील ॲल्युमिनियम या वस्तूची स्थानिकरित्या खरेदी केलेल्या दराची तुलना करीत असताना मे. नॅशनल ॲल्युमिनियम कं. (भारत सरकारचा उपक्रम) हे ॲल्युमिनियम या वस्तुचे बाजारपेठेतील चढ उतार व ॲल्युमिनीयम इनगॉटचे दर निश्चित करीत असतात त्यांच्या दराचा मूळ (बेस) धरून व इतर खर्चाचा अंतर्भाव करून दराची तुलना करणे गरजेचे ठरते. या तत्वानुसार

तुलना केली असता खालील प्रमाणे प्रत्यक्षात जास्त खर्च झाला नसल्याचे दिसून येईल. ते खालील प्रमाणे आहे.

| मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी | |
|---|---|
| | रक्कम रु. (लाखात) |
| शासकीय लेखा परिक्षक यांनी दर्शविलेला अतिरिक्त खर्च व स्थानिक खरेदी केलेल्या रक्कमेची तुलना दरकरार क्र. ९ सन २००५-०६ (दरानुसार) | ६४.५६ |
| डिसेंबर, २००५ ते सप्टेंबर, २००६ या कालावधीत बाजारपेठेत अस्तित्वात असलेले दर व मे. हिंडाल्को यांचा इतर खर्चाचा अंतर्भाव करून आलेले दर त्याची तुलना मे. नाल्को यांचा बेस धरुन केली असता. | ६९.९६ |
| फरक | (-) ५.४० |

| मध्यवर्ती कार्यशाळा, नागपूर | |
|---|---|
| | रक्कम रु. (लाखात) |
| शासकीय लेखा परिक्षक यांनी दर्शविलेला अतिरिक्त खर्च व स्थानिक खरेदी केलेल्या रक्कमेची तुलना दरकरार क्र. ९ सन २००५-०६ (दरानुसार) | ३०.९१ |
| डिसेंबर, २००५ ते सप्टेंबर, २००६ या कालावधीत बाजारपेठेत अस्तित्वात असलेले दर व मे. हिंडाल्को यांचा इतर खर्चाचा अंतर्भाव करून आलेले दर त्याची तुलना मे. नाल्को यांचा बेस धरुन केली असता | २८.०५ |
| फरक | (+) २.८६ |

| युनिट | रक्कम रु (लाखात) |
|---|---|
| मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी | (-) ५.४० |
| मध्यवर्ती कार्यशाळा, नागपूर | (+) २.८६ |
| एकंदरीत कमी खर्च | (-) २.५३ |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन केले असता, असे निदर्शनास येते की, स्थानिक बाजार पेठेतून झालेली खरेदी हे त्यावेळेसच्या बाजारपेठेत अस्तित्वात असलेल्या दरानुसारच झाली असून एकंदरीत खर्च रु. २.५३ लाखाची कमी झाल्याचे दिसून येते.



मध्यवर्ती कार्यशाळा, औरंगाबाद मार्फत जोखीम खरेदीचे दावे मे. हिंडाल्को यांचेवर लावलेले नाहीत. कारण कार्यशाळा व्यवस्थापक, औरंगाबाद यांनी सदर करार क्र. ९ (२००५-०६) कार्यान्वीत नसल्याने खरेदी आदेशच प्रसारीत केलेले नव्हते. त्यामुळे त्यांचेवर जोखीम खरेदीचा दावा होवू शकला नाही.

मध्यवर्ती कार्यशाळा, पुणे व नागपूर येथे डिसें. २००५ ते जून, २००६ या कालावधीत स्थानिकरित्या खरेदी केलेल्या दराची तपासणी व छाननी केली असता कसल्याही प्रकारचा अतिरिक्त खर्च झालेला दिसून येत नाही. कारण ॲल्युमिनियम या धातूचे बाजारपेठेतील दर मे. नॅशनल ॲल्युमिनियम कंपनी (भारत सरकारचा अंगीकृत व्यवसाय) यांचेमार्फतच निश्चीत केले जातात व या वस्तूच्या दरामध्ये चढ/उतार यावर त्यांचे संपूर्ण नियंत्रण असते. त्यामुळे मध्यवर्ती कार्यशाळांनी स्थानिक बाजारपेठेतून खरेदी केलेल्या दराची तपासणी केली असता त्यावेळेसच्या बाजारपेठेत अस्तित्वात असलेल्या दराप्रमाणेच खरेदी झाल्याचे निदर्शनास येत आहे व प्रारुप परिच्छेदात नमूद केल्याप्राणे अतिरिक्त खर्च झाला नसल्याचे दिसून येत आहे.

स्थानिक खरेदी करीत असतांना मध्यवर्ती कार्यशाळेमार्फत त्यांनी निविदा मागवून प्रचलित कार्यपद्धतीचा अवलंब करून खरेदी केली असल्याने बाजारपेठेत अस्तीत्वात असलेल्या दरानेच खरेदी केल्याचे निदर्शनास आलेले आहे व सदरची खरेदी ही महामंडळाच्या हितासाठीच करण्यात आलेली आहे. कारण त्यावेळेस मध्यवर्ती कार्यशाळांना बस बांधणीच्या नियोजनाप्रमाणे उत्पादन अखंडीतपणे सुरू ठेवण्यासाठी अन्य कोणताही पर्याय नव्हता.

उपरोक्त प्रमाणे बस बांधणीच्या उत्पादनाच्या नियोजनाप्रमाणेच बस बॉडीचे उत्पादन झाले असून व उत्पादीत झालेल्या बसेस मार्फत महामंडळास उत्पन्न प्राप्त झाले आहे. म्हणून सदरचा स्थानिक खरेदी मार्फत झालेला खर्च हा अतिरिक्त खर्च संबोधित करता येत नाही.

वरील बाबी व स्पष्टीकरणाच्या आधारे अशी विनंती करण्यात येते की, सदरचा परिच्छेद बंद करण्यात यावा.

१.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने पुढील प्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत. शासकीय लेखा परिक्षणाने परिच्छेदामध्ये दर्शविलेल्या जादा खर्चाबाबत महामंडळाने योग्य ती कारणमिमांसा दिलेली आहे. त्याचप्रमाणे प्रस्तुत प्रकरणी घेतलेले निर्णय महामंडळाच्या कार्यकक्षेत येतात त्यामुळे महामंडळाच्या मताशी शासन सहमत आहे.

१.४ समितीला मिळालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने परिवहन विभागाचे सचिव तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मर्यादित यांचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक व इतर संबंधित अधिकारी यांची मंगळवार, दि. १४ जून, २०११ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी विभागीय सचिवांनी विषद केले की, दि. १५ जुलै, २००३ मध्ये ॲल्युमिनियम रोल्ड प्रोडक्ट आणि ॲल्युमिनियम एक्ट्रूजन खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्याचा निर्णय महामंडळाने घेतला. त्यासाठी महामंडळाच्या संचालक मंडळाने जानेवारी, २००४ मध्ये पुरवठादारासोबत निवेदेनुसार दर निश्चित केले व

अॅल्युमिनियम रोल्ड प्रोडक्ट रु. १, १४, ५००/- प्रती मॅट्रीक टन व अॅल्युमिनियम एक्सट्रूडेड रु. १, ०५, ०००/- प्रती मॅट्रीक टन दराने खरेदी करण्याचे निश्चित केले होते. सदर खरेदी १८ मार्च, २००४ पासुन ते १७ मार्च, २००५ पर्यंत या एका वर्षाकरिता उपरोक्त उत्पादन पुरवठादाराकडून खरेदी करावयाचे होते. निवेदेमध्ये सादर केलेल्या दरामध्ये पहिल्या तीन महिन्यासाठी म्हणजे पहिल्या तारखेपासून पुढील तीन महिन्यापर्यंत फेरफार होणार नाहीत असे ठरविण्यात आले होते. तीन महिन्यानंतर दरामध्ये वाढ झाली तर महामंडळाचे व्यवस्थापन व पुरवठादार यांनी एकत्र बसून दराबाबत चर्चा करून दर ठरवावयाचे निश्चित झाले होते. सदर करार दि. १८ मार्च, २००४ रोजी हिंडाल्को या पुरवठादार कंपनी सोबत केला होता. परंतू पुरवठादाराने दि. १० मार्च, २००४ रोजी म्हणजे करार करण्यापूर्वी आठ दिवस आगोदर जो दर निवेदेमध्ये कोड केला होता त्यामध्ये प्रती मॅट्रीक टन आठ हजार रुपयाने वाढीची मागणी केली होती. वास्तविक पाहाता जानेवारी, २००४ मध्ये ज्या दरानुसार निवेदा भरली होती त्यामधील दरापेक्षा वाढीव दरानुसार दर वाढ देण्याचा पुरवठादाराकडून आग्रह होता. पुरवठादाराला दि. १ ऑक्टोबर, २००४ पासून २७५० प्रती मॅट्रीक टन दरवाढ देण्याचे महामंडळाने मान्य केले होते. त्यामध्ये पुरवठादार समाधानी नव्हते. म्हणून दि. १ जानेवारी, २००५ पासून ७०००/- रु. मॅट्रीक टन दरवाढ देण्याचे महामंडळाने सुचविले होते परंतु पुरवठादार देखील कराराच्या दिवसापासुन दरवाढ मागण्याबाबत आग्रही होते. सप्टेंबर, ऑक्टोबर नंतरच्या कालावधीपासुन पुरवठादाराकडून पुरवठा करावयाच्या वस्तुमध्ये नियमित खंड पडत गेला त्यामुळे महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यशाळा दापोली, नागपूर यामधील बस तयार करण्याच्या कामामध्ये व्यत्यय निर्माण झाला. त्यावेळी महामंडळाने स्थानिक स्तरावर खरेदी करण्याबाबतचे अधिकार संबंधित आगारांना पुर्वीच दिले असल्याने स्थानिक स्तरावरुन सामानांची खरेदी करण्यात आली असे विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी नमूद केले. जानेवारी, २००५ मध्ये पुरवठा दाराकडून पुरवठा कमी पडल्यानंतर सहा महिन्याच्या खरेदीसाठी एक निविदा काढण्यात आली. त्यावेळी पुरवठादार कंपनीकडून निविदा सादर करताना पुर्वीच्या तुलनेत १२ हजार प्रती मॅट्रीक टन हा जादा दर नमूद केला होता की जो कंपनीकडून यापूर्वी सादर करण्यात आलेल्या ८ हजार प्रती मॅट्रीक टन दर वाढीच्या तुलनेत देखील जास्त होता. महामंडळ दि. १ जानेवारी, २००५ पासून ७ हजार प्रती मॅट्रीक टन दर वाढ देण्यास तयार होते. यामुळे महामंडळ व पुरवठादार यांच्यामध्ये वाद निर्माण होऊन पुरवठादाराकडून उत्पादन सामुग्रीचा पुरवठा करणे बंद केले. याकरिता महामंडळाने दि. १७ मे, २००५ रोजी संचालक मंडळाकडून ठराव करून पुरवठादारास दोन तीन महिन्याचा जादा कलावधी देण्याचे ठरले. परंतु सदर प्रस्ताव देखील पुरवठादाराने मान्य केला नाही व कमी कालावधीसाठी पुरवठा करण्यास नकार दिला. त्यामुळे महामंडळाला गरज लागणा-या सामानाची खरेदी स्थानिक स्तरावर वसुल करणे भाग पडले. तद्नंतर असे ठरले की, सदरहू रक्कम रिक्त प्राईस मधून वसूल करावी. यावर पुरवठादाराने कायदेशीर सल्ला घेतला व रिस्क प्राईस या करारास लागू होत नाही असा सल्ला पुरवठादाराला मिळाला होता असेही विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी स्पष्ट केले. यावर हिंडाल्को कंपनी ही अॅल्युमिनियम सामानाचा पुरवठा करण्यामध्ये मक्तेदार होती काय व कंपनी व्यतिरिक्त इतर कंपन्या सदरहू उत्पादनाचा पुरवठा करीत



नाहीत काय या समिती प्रमुखांच्या प्रश्नाला उत्तर देताना महामंडळाचे महाव्यवस्थापक, भांडार व खरेदी यांनी सांगितले की, भारतामध्ये अॅल्युमिनियम निर्माण करणारी बाल्को ही शासनाची कंपनी होती. परंतू ही कंपनी आता खाजगी झाली आहे. नाल्को कंपनी भारत सरकारचा उपक्रम म्हणून काम करते. तिसरी कंपनी हिंडाल्को व चौथी कंपनी इंडिया अॅल्युमिनियम (मे इंडाल्को) अशा एकूण चार कंपन्या आहेत. निविदा भरतेवेळी हिंडाल्को व इंडाल्को या स्वतंत्र कंपन्या होत्या परंतु आता त्यांचे विलिनिकरण झाले आहे. नाल्को कंपनी ही अॅल्युमिनियम सामानाची उत्पादन करीत नसल्यामुळे व बाल्को कंपनीने स्पर्धेत भाग न घेतल्यामुळे हिंडाल्को कंपनीवर उत्पादन खरेदीसाठी अवलंबुन रहावे लागते. बाल्को कंपनी बरोबर निविदा काढण्याच्या दोन वर्षापूर्वी म्हणजे २००२ च्या दरम्यान वाद निर्माण झाला होता व तो सन २००४ च्या दरम्यान पर्यंत सुरूच होता त्यामुळे सदर कंपनीने निवेदा प्रक्रियेमध्ये भाग घेतला नव्हता असे महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी स्पष्ट केले. हिंडाल्को कंपनीने कराराच्या बाहेर जाऊन करार केलेल्या दिवसाच्या आगोदरपासूनच दरवाढ मागितली असल्यामुळे वाद निर्माण झाला होता. महामंडळाने हिंडाल्को कंपनीला उत्पादन पुरवठा करण्यासाठी जानेवारीमध्ये निर्णय घेतला व करार करण्यास मार्च, २००७ च्या म्हणजे जवळ-जवळ तीन महिन्याचा विलंब झाला. त्यामुळे प्रत्यक्ष करार करण्यापूर्वी पुरवठादाराने मागितलेल्या दरवाढीबाबत चर्चा का करण्यात आली नाही तसेच हिंडाल्को कंपनीला स्पर्धा नसल्यामुळे त्यांना उत्पादन पुरवठा करण्यासाठी देकार देण्याशिवाय पर्याय नव्हता व पुरवठादार कंपनीने कोणता कागदोपत्री सबळ पुरावा महामंडळास द्यावयास हवा होता या समितीच्या विचारणेस उत्तर देताना अॅल्युमिनियमच्या निविदा भरलेल्या वेळेच्या दरामध्ये व आता वाढ मागण्यात आलेल्या दरामध्ये कोणता फरक पडला आहे हे कागदोपत्री सादर करावे अशी करारामध्ये नोंद केली होती असे महाव्यवस्थापक भांडार व खरेदी यांनी सांगितले तसेच कागदोपत्री पुरावा नसल्यास केलेली भाववाढ योग्य असल्याबाबत कंपनीच्या चार्टर्ड अकौंटंट यांच्याकडून प्रमाणपत्र सादर करण्यासाठी महामंडळाने कंपनीला सवलत दिली होती असेही त्यांनी स्पष्ट केले. हिंडाल्को व बाल्को यांचे दर सारखे होते काय तसेच बाल्को या कंपनीबरोबर मतभेद झाल्यानंतर ते दूर करण्यासाठी काय प्रयत्न केले या समिती सदस्यांच्या प्रश्नावर उत्तर देताना महाव्यवस्थापक भांडार व खरेदी यांनी सांगितले की, सन २००२ मध्ये बाल्को कंपनी महामंडळाच्या दर करारावर होती. त्यावेळी हिंडाल्को कंपनी महामंडळाच्या दर करारावर नव्हती. बाल्को कंपनीकडून करारात नमूद केल्यानुसार सामानाचा पुरवठा न करता कमी दर्जाचे सामान पुरवठा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे व सदर गैरव्यवहारामध्ये महामंडळाच्या अधिका-यांचा देखिल समावेश असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे महामंडळाचे व बाल्कोचे अधिकारी यांच्यावर गुन्हेगारी स्वरुपाची प्रकरणे दाखल केली आहेत व सदर प्रकरणामध्ये बाल्को कंपनीचे २२ लाख रुपयांचे देयक अद्याप अदा केलेले नाहीत. त्यामुळे बाल्को कंपनीने महामंडळाच्या कोणत्याही निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेतलेला नाही. बाहेरील बाजारभावाने खरेदी केलेल्या वस्तुंची गुणवत्ता तपासुन घेण्यात आली होती काय या समिती प्रमुखांच्या प्रश्नावरती उत्तर देताना महाव्यवस्थापक भांडार व खरेदी यांनी सांगितले की, या व्यवसायाशी निगडीत असलेल्या अशोक मेहता ट्रेडिंग कंपनी व लंडन

मेटल एक्सचेंजचे दर यांची तपासणी करून त्याप्रमाणे नोंदणी घेण्यात आल्या होत्या. याप्रकरणाशी निगडीत इतर राज्यातील शासकीय परिवहन सेवेसाठी पुरवठादार असलेल्या संबंधित राज्याकडून माहिती मागविण्यात आली होती काय या समिती सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना महाव्यवस्थापक भांडार व खरेदी यांनी सांगितले की, गुजरात, कर्नाटक व आंध्र या राज्यांकडून दराबाबतची माहिती मागविण्यात आली होती. त्यामुळे सदर दरवाढ योग्य की आयोग्य याबाबत अभिलेखात उल्लेख आलेला आहे. महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकिय संचालक यांनी उत्तरादाखल असेही स्पष्ट केले की, महामंडळाच्या तीनही आगारामधील वाहन बनविण्याचे काम पुरवठादारांनी पुरवठा बंद केल्याने स्थगित झाले होते. त्यामुळे स्थानिक बाजारातून वस्तुंची खरेदी करावी लागली व त्यासाठी पुरवठादारांनी दर वाढ मागितलेल्या रक्कमेच्या तुलनेत जास्त रक्कम अदा करून खरेदी करावी लागली हे त्यांनी मान्य केले. पुरवठादारांनी निविदा प्रक्रिया भरल्यानंतर त्यास मान्यता दिल्यानंतर प्रत्यक्ष करार करण्यास तीन महिन्याचा कालावधी का लागला या समिती प्रमुखांच्या प्रश्नावरती उत्तर देताना भांडार व्यवस्थापक यांनी सांगितले की, निविदा प्रक्रियेच्या इतिवृत्तास मार्च महिन्यात मंजूरी मिळाल्यानंतर त्यावर कार्यवाही सुरु झाली होती. महामंडळ स्तरावर विविध प्रकारचे उपकरणे खरेदी करण्यासाठी भांडार समिती होती ती समिती बरखास्त करून त्याचे अधिकार संचालक मंडळाकडे केव्हा सोपविण्यात आले या समिती सदस्यांच्या प्रश्नावरती उत्तर देताना वित्तिय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी स्पष्ट केले की, ऑक्टोंबर, २००३ मध्ये भांडार समिती स्थापन झाली होती. जुलैमध्ये निविदा मागविण्यात आल्या त्यावेळी सदर कमेटी आस्तित्वात नव्हती त्यामुळे महामंडळाच्या अध्यक्षांनी खरेदीकरणाचा निर्णय संचालक मंडळाने घ्यावा असे ठरविले होते. स्थानिक स्तरावून खरेदी करण्यासाठी करारनामा करण्यास जाणिवपुर्वक उशिर करण्यात आला की ज्यामुळे स्थानिक व्यक्तिला त्याचा फायदा होवून महामंडळाला तोटा झाला आहे या समिती सदस्यांच्या प्रश्नावरती उत्तर देताना उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकिय संचालक यांनी सांगितले की, महामंडळाचा ९४५६ क्रमांकाच्या असलेल्या ठरावातील तरतुदीनुसार कार्यशाळेमध्ये करण्यात येणा-या पुरवठामध्ये काही बाधा पोचत असेल तर व काही अडचणी भासत असल्यास स्थानिक स्तरावर खरेदी करण्यात यावी, यामुळे स्थानिक स्तरावरुन या प्रकरणामध्ये खरेदी करण्यात आली. सुंदरम् ब्रेक्स, हिंदुस्थान ब्रेक्स, राणे ब्रेक्स हे ओए सप्लाय असल्यामुळे त्यांची तांत्रिक पात्रता व गुणवत्ता तपासण्यात येवून त्यांच्याकडून खरेदी करण्यात आली. राणे ब्रेक्स यांना तीन वर्षासाठी करार बध्द करण्यात आले आहे. त्यांचा अनुभव १०० % चांगला असल्याचे दिसून आले आहे. त्याच्याशी झालेल्या व्यवहारामधून २८ लाख रुपयांची बचत झाली आहे असेही महाव्यवस्थापक, भांडार व खरेदी यांनी एका उत्तरादाखल स्पष्ट केले आहे. महामंडळासाठी लागणा-या विविध उपकरणांची खरेदी कशी केली जाते या समिती प्रमुखांच्या प्रश्नावरती उत्तर देताना महाव्यवस्थापक भांडार व खरेदी यांनी सांगितले की, खरेदी प्रक्रियेतील काही भाग महामंडळाने ठरविला आहे. तर काही भाग शासनाच्या निर्देशाप्रमाणे आहे. वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया दराने खरेदी करण्यास शासनाचे निर्देश आहेत. महालेखाकारांनी स्थानिक स्तरावरुन खरेदी केल्यामुळे १.२७ कोटी रुपयाचे महामंडळाला आर्थिक नुकसान सोसावे लागले. याबाबत समिती



सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी सदर वस्तुस्थिती मान्य केली. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी पुढे असेही नमूद केले की, सद्यस्थितीमध्ये महामंडळाने पाच हजार बसेसची निर्मिती प्रायोगिक तत्वावरती ॲल्युमिनियम ऐवजी माईल्ड स्टीलचा वापर करून बांधल्याजात असून फ्युएल इफिशियन्सीवर त्याचा काय परिणाम होतो हे पाहून त्याबाबतचा निर्णय पुढील काळात घेण्यात येईल.

**१.५ अभिप्राय व शिफारशी :**

**महालेखाकार यांनी आक्षेप घेतलेल्या परिच्छेदानुसार महामंडळाने पुरवठाकाराच्या दरवाढीचे दावे नाकारल्याने व वस्तुंची स्थानिक बाजारातून खरेदी केल्यामुळे महामंडळाला १.२७ कोटी रुपयाचे आर्थिक नुकसान झाले होते, याबाबत " टाळता येण्याजोगा जादा खर्च " यासदराखाली जे नमूद करण्यात आलेले आहे ते योग्य होते अशी वस्तुस्थिती समितीपुढे आलेल्या साक्षी पुराव्यावरुन दिसून येते. ॲल्युमिनियम रोल्ड प्रॉडक्ट व अल्युमिनियम एक्सटुडेड खरेदी यासाठी पुरवठाकाराने सादर केलेल्या निवेदेनुसार दर कराराबाबत निर्णय घेण्यासाठी महामंडळाकडून तीन महिन्याचा विलंब झाला होता. वस्तुंच्या खरेदीसाठी करार करण्यासाठी निवेदेस मान्यता दिल्यानंतर प्रत्यक्ष करार करावयाच्या दिनांकापर्यंत झालेल्या दिरंगाईमुळे वा त्यासाठी लागलेल्या अधिक कालावधीमुळे बाजारातील चढ उतार विचारात घेता खरेदी करावयाच्या वस्तूंचे मुल्य बदलण्याची शक्यता निश्चितच होती. त्यामुळे पुरवठादाराने दर करारामध्ये वाढीव रक्कमेची केलेली मागणी पडताळून पाहणे अत्यंत गरजेचे होते. त्यातच ॲल्युमिनियम वस्तुंच्या उत्पादनामध्ये भारतात असलेल्या मोजक्या उत्पादकामुळे स्पर्धात्मक बोलीचा अभाव होता. पुरवठादार व महामंडळ यामधील अधिका-यामध्ये वाढीव दराबाबत एक वाक्यता न झाल्यामुळे खरेदी प्रक्रियेसाठी अधिक विलंब होत गेला. दराबाबत निर्माण झालेला वाद दोन्ही बाजूकडून सामंजस्याने हाताळला न गेल्याने वाद वाढून पुरवठादाराने सुरु केलेला पुरवठा देखील बंद केला होता परिणामी त्याचा महामंडळाच्या कार्यशाळेतील आगारातील कामकाजावर निश्चितच विपरीत परिणाम झाला आणि महामंडळास काम चालू ठेवण्यासाठी स्थानिक बाजारातून बाहेरील दराने वस्तु खरेदी करण्याचा निर्णय घ्यावा लागला. परिणामी याप्रक्रियेत महामंडळास निश्चितच तोटा झाला. याप्रकरणी इतर राज्याकडून मागितलेली माहिती तसेच अशोक मेहता ट्रेडिंग कंपनी व लंडन मेटल एक्सेंज यांचे दर मागवून तपासणी करून वाढीव दर योग्य होते किंवा कसे याबाबत अभिलेख्यात मत नोंदविलेले असल्याचे समितीपुढे प्रतिपादन करण्यात आले, असे असले तरी एकंदरीत दराबाबतची उचित पडताळणी न केल्यामुळे पुरवठादार यांनी मागितलेल्या वाढीव दरापेक्षा जास्त दराने वस्तुंची खरेदी महामंडळास स्थानिक बाजारातून करावी लागली हे स्पष्ट होते. यामध्ये महामंडळाचा व्यवहार सुयोग्य वाणिज्यिक प्रथांनुसार व सुस्थिर व्यापारी तत्वावर झाल्याचे दिसून येत नाही. तसेच यापुर्वी बाल्को या पुरवठादार असलेल्या कंपनी समवेत झालेल्या खरेदी व्यवहारात महामंडळाचे अधिकारी व कंपनीचे अधिकारी यांच्या संगनमताने झालेल्या गैरव्यवहाराबाबत व त्याप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या तक्रारीवरुन एकंदरीत खरेदी व्यवहाराबाबत साशंकता**

वाटते. आवश्यक असलेल्या वस्तुंचा पुरवठा करण्यासाठी दुसरी कुठलीही कंपनी अस्तित्वात नसताना पुरवठादारांशी विलंबाने केलेला करार याबाबत शंका उपस्थित होण्यास वाव निर्माण होता. तसेच याप्रकरणी निर्माण झालेल्या परिस्थितीच्या वेळी महामंडळाच्या हिताचा विचार विनिमय करून योग्य तो मार्ग काढण्यासाठी महामंडळाने वेळेवर न घेतलेले निर्णय यामुळे आर्थिक नुकसानीचे परीणाम दिसून येत असल्याचे समितीचे मत झाले आहे. अतः याप्रकरणी चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून उचित कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करीत असून यापुढील काळात एकाधिकारशाही असलेल्या कंपन्यांकडून खरेदी प्रक्रिया करतांना सर्वकष विचार करून अधिकाधिक पारदर्शकता ठेवून महामंडळाच्या आर्थिक हितास कोणतीही बाधा पोहचणार नाही याची पुरेपुर काळजी घ्यावी व खरेदी प्रक्रिया करावी. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशीही समितीची शिफारस आहे.

## शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

### दोन : लेखापरीक्षणाची व्याप्ती

**२.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.२. मध्ये " लेखापरीक्षणाची व्याप्ति " यासंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, प्रस्तुत कामकाज प्रगती आढाव्यात कंपनीने स्वतःच्या योजना म्हणून राबवलेल्या १० एसआर योजनांचा कार्यचालन कामकाज प्रगतीचा समावेश केला आहे. लेखापरीक्षण छाननीत नियोजन व अंमलबजावणी प्रक्रिया कंत्राटदार, प्रकल्प व्यवस्थापन समंत्रक (पीएमसी) वास्तुरचनाकारांना केलेली प्रदाने आणि पूर्ण झालेल्या गाळयांच्या हस्तांतरणाचा अंतर्भाव आहे. हया शिवाय खाजगी विकासकाद्वारे कार्यान्वित करण्यासाठी मंजूर झालेल्या ३० योजनेत, कंपनीचा सहभाग केवळ भांडवल पुरवठादार म्हणून होता. त्यामुळे अशा योजनांना दिलेले वित्त सहाय्य व त्याची वसूली याबाबीचाच समावेश आढाव्यात केला आहे. हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टीडीआर) विक्री संबंधीच्या अनियमिततेवर महाराष्ट्र शासनाकरता वर्ष २००४-०५ व २००६-०७ साठी असलेल्या लेखापरीक्षा अहवाल (वाणिज्यिक) यांच्या अनुक्रमे परिच्छेद क्रमांक ४.१२ व ४.२१ मध्ये भाष्य केले होते. वर्ष २००४-०५ च्या लेखापरीक्षा अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.१२ वर सार्वजनिक उपक्रम समितीने (समिती) चर्चा केली (मे २००७) आणि शिफारसी जारी केल्या (जुलै २००७) समितीने टीडीआर विक्रीचे अन्वेषण करण्याची शिफारस केली आणि जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश दिले. शिफारशीवर केलेल्या कारवाईची टिप्पणी प्रतिक्षित होती (डिसेंबर २००८)

**२.२** याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमुद केले की, सदर परिच्छेद माहितीस्तव/प्रस्तावनात्मक असल्याकारणाने याबाबत अभिप्रायाची आवश्यकता नाही. सार्वजनिक उपक्रम समितीच्या अकराव्या अहवालातील हस्तांतरणीय



विक्री हक्काच्या सदोष विक्री पध्दतीमुळे झालेल्या तथाकथित रु. ३.२३ कोटी नुकसानीची जबाबदारी निश्चित करून दोषी अधिका-यांकडून नुकसान भरपाई करून घ्यावी या शिफारशीबाबत संचालक मंडळाला दि. १० सप्टेंबर, २००७ च्या बैठकीत व्यवस्थापकीय संचालकांनी विस्तृतपणे सांगितले की, कंपनीने अवलंबिलेली पध्दती ही मुख्य दक्षता आयुक्तांनी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वप्रणालीच्या अधीन राहून होती. त्यामुळे ती पध्दती सदोष नव्हती व दर्शविलेला तोटा प्रत्यक्ष नसून गृहितकांच्या आधारे परिगणित आहे. त्यावर संचालक मंडळाने व्यवस्थापकीय संचालकांना हया सर्व व्यवहारीची सखोल टिप्पणी शासनाला सादर करावी व शासनाला विनंती करावी की, उचित स्तरावर याची जाण देण्यात यावी. कंपनीने त्याप्रमाणे मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, शिपुप्रलि यांच्या मान्यतेने गृहनिर्माण विभागाला त्याप्रमाणे अवलंबिलेल्या पध्दतीची विस्तृत माहिती विहित नमुन्यातील कार्यपालन अहवाल सादर करताना दिली आहे. गृहनिर्माण विभागाने सदर अहवालास संचालक मंडळाच्या अपेक्षित मान्यता गृहित धरुन गृहनिर्माण विभागाच्या शिफारशींसह सार्वजनिक उपक्रम समिती, विधानसचिवालयास सादर केला आहे असे समजते.

**२.३** याबाबत विभागाने पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत. सन २००४-०५ या वर्षाच्या परिशिष्ट क्र. ४.१२ बाबत सार्वजनिक उपक्रम समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत दि. ७/८/२०१० च्या पत्रान्वये विधानमंडळास कळविण्यात आलेले आहे. सन २००५-२००६ या वर्षाच्या वाणिज्यिक अहवालातील मुदा क्र. ४.१४ व सन २००६-०७ या वर्षाच्या वाणिज्यिक अहवालातील परिशिष्ट क्र. ४.२१ ते ४.२४ बाबत तसेच कंपनीच्या स्थितीबाबत अनुक्रमे दि. १९/५/२०१० व दि. १/९/२०१० रोजी सचिव (गृहनिर्माण) यांची सार्वजनिक उपक्रम समितीसमोर साक्ष झाली आहे.

**२.४** याप्रकरणी गृहनिर्माण विभाग व शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने ६ जुलै, २०११ रोजी गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव तसेच झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली. महालेखाकारांनी " लेखापरिक्षणाची व्याप्ती " याशिर्षकाखाली व्यक्त केलेल्या अभिप्रायासंबंधाने माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, टी.डी.आर. विक्री संबंधाने सार्वजनिक उपक्रम समितीने १४ डिसेंबर, २०१० रोजी सभागृहास सादर केलेल्या दुस-या अहवालातील शिफारशीबाबत पुढील प्रमाणे वस्तुस्थिती असल्याचे सांगितले. टी.डी.आर. विक्री ही बाजारातील असलेल्या मुल्याच्या चढ उतारावर अवलंबुन असते व त्यामध्ये नेहमी कमी जास्त याप्रमाणात बदल होत असतो. काही दिवस थांबुन टी.डी.आर विक्री करण्याचा निर्णय घेतला तर त्याबाबत शासन स्तरावर चर्चा होते व टी.डी.आर. कमी किंमत असताना विकला गेल्यास सदर टी.डी.आर. विकण्याची घाई केल्यामुळे आर्थिक नुकसान झाल्याचे महालेखाकार यांच्याकडून नमुद केले जाते. प्रत्यक्ष टीडीआर ज्यावेळी उपलब्ध होईल त्यावेळी त्याची विक्री होणे उचित असते. व त्यामधून पारदर्शक निविदा मागवून विक्री केल्यास अधिक सोईचे होईल असे स्पष्ट केले. टी.डी.आर विक्रीनंतर लेखापरिक्षण केले जात असताना त्यावेळी असलेल्या कालावधीशी तुलना करून त्याप्रमाणे आक्षेप नोंदविले जात असल्यामुळे यामध्ये

नेहमी तफावत आढळून येते. याकरिता टी.डी.आर. विक्रीसाठी पारदर्शक धोरण ठेवून विकेंद्रिकरण करणे हीच पध्दत योग्य आहे. यासाठी समितीने आपल्या यापुर्वीच्या शिफारशीचा फेर विचार करावा अशी त्यांनी विनंती केली.

२.५ अभिप्राय व शिफारशी :

**शिवशाही पुनर्वसन प्रकल्पातील विकास कामे केली जात असताना प्राप्त होणारा टी.डी.आर व त्याची विक्री करण्यासाठी अनुसरावयाची पध्दत याबाबत समितीने दिनांक १४ डिसेंबर, २०१० रोजी सभागृहास सादर केलेल्या आपल्या दुस-या अहवालातील शिफारशीबाबत विभागाकडून सादर केलेले लेखी निवेदन व विभागीय सचिवांनी समितीपुढे विषद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, समिती आपल्या उपरोक्त अहवालातील शिफारशीबाबत फेर विचार करून टी.डी.आर. विक्रीसाठी बाजारातील चढ उतार लक्षात घेता जास्तीत जास्त फायदा होण्यासाठी टी.डी.आर.विक्रीचे स्पष्ट पारदर्शक धोरण ठरवून निविदा प्रक्रियेचा अवलंब करावा व विक्रीप्रक्रीयेसाठी विकेंन्द्रीकरण ठेवण्यास हरकत नसावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**तीन : खाजगी विकासकांना वित्तिय सहाय्य**

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.११ मध्ये " खाजगी विकासकांना वित्तिय सहाय्य " यासंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, एसआरएने मंजूर केलेल्या एसआरए योजना खाजगी विकासकामार्फत कार्यान्वित करावयाच्या होत्या. हया योजनांतर्गत पुरवलेल्या जमीनीचे हक्क सदोष असल्यामुळे खाजगी विकासक खुल्या बाजारातून निधी उभारण्यात असमर्थ ठरले होते. त्यामुळे १४८०९ पुनर्वसन गाळे सम्मिलित असलेल्या ३० एसआरए योजनांचे कार्यान्वयन करत असलेल्या १५ खाजगी विकासकांना कंपनीने प्रकल्प खर्चाच्या ७० टक्के सममुल्य असलेल्या रुपये ५३६.१० कोटीचे कर्ज मंजूर केले होते. कराराच्या अटीप्रमाणे विकासकाला हे कर्ज १७.५ टक्के प्रतिवर्ष दराच्या व्याजासहित तीन/चार वार्षिक हप्त्यात परत करायचे होते आणि कर्जाची संपूर्ण परतफेड योजना पूर्ण झाल्यानंतर एक वर्षाच्या आत करावयाची होती. कंपनीने रुपये ७३.८५ कोटीचा बटवारा केला (एप्रिल ते सप्टेंबर १९९९) आणि पुढील आदेशापर्यंत आधीचे निर्णय तहकूब ठेवण्याच्या शासनाच्या सूचनेप्रमाणे (ऑक्टोबर १९९९) कंपनीने पुढील कर्ज वितरण बंद केले (ऑक्टोबर १९९९) कंपनी विकासकांना पूर्ण वित्तीय सहाय्य पुरवू शकली नसल्यामुळे वसूल करावयाच्या व्याजाचा दर सरळ व्याजाच्या धर्तीवर १० टक्के प्रतिवर्ष इतका कमी करण्याचा निर्णय घेतला (जून २००४) हुडकोकडून घेतलेल्या रुपये ५८.२२ कोटीच्या कर्जावरील व्याजाचा दर १३.७५/१४ टक्के प्रतिवर्ष होता, म्हणून खाजगी विकासकांकडून कमी व्याजाच्या दरात केलेल्या वसुलीची परिणिती जानेवारी २००० ते डिसेंबर, २००४ दरम्यान कंपनी करीता रुपये ६.७६ कोटीच्या वित्तीय बर्हिगमनात झाली होती.



३.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमुद केले की, सदर परिच्छेद माहितीस्तव/प्रस्तावनात्मक असल्याकारणाने याबाबत अभिप्रायाची आवश्यकता नाही. विकासकांना दिलेली कर्ज दीर्घकाल प्रलंबित होती. त्यांच्याकडे वारंवार मागणी करण्यात येत होती. करारनाम्याप्रमाणे कर्जाचे पूर्ण वाटप झाले नसल्यामुळे तसेच न्यायालयात गेल्यावर निकालाच्या कालावधीची व परिणामाची अनिश्चितता तसेच ऋणकोना आयतीच अनुद्देशित आणखी समयवृध्दी मिळू नये म्हणून न्यायालयात जाणे अनुचित वाटले. कर्ज वसूलीला गति मिळावी म्हणून यावेळेच्या चालू व्याजदरापर्यंत (१० टक्के) व्याज दर मूळापासून लागू करून संचालक मंडळाने एकरकमी परतफेड योजना त्यावेळी सर्व प्रलंबित कर्जदारांना लागू केली होती. लेखापरिक्षकांनी व्यक्त केल्याप्रमाणे ती फक्त अपूर्ण कर्ज वितरण केलेल्यांसाठी नव्हती. ज्या दोन कर्जदारांना पूर्ण कर्ज वितरण केल्याने सदर योजना लागू होत नाही असा जो उल्लेख लेखापरिक्षकांनी केला आहे व त्यामुळे त्यांना व्याज सूट दिल्यामुळे कंपनीचे रु. ३६.५१ लाख नुकसान झाले असल्याचे नमूद केले आहे त्या दोन कर्जदारांचा अपवाद करण्याचे संचालक मंडळाच्या ठरावात नमूद केले नव्हते. कारण सदर योजना सर्व प्रलंबित कर्जदाराना लागू करण्यात आली होती. त्या दोन कर्जदाराना लागू करण्यात आली होती. त्या दोन कर्जदारांनी करारनिर्दिष्ट दराप्रमाणे सुरुवातीस व्याज भरणा केला होता व असा एकूण व्याज भरणा एकरकमी योजनेनुसार व्याज आकारणी प्रमाणे भरावयाच्या व्याजापेक्षा रु. २६ लाखानी जास्त होता. त्यामुळे लेखापरिक्षकांनी नोंदविल्याप्रमाणे संचालक मंडळाच्या ठरावाधिन राहून आर्थिक तोटा झालेला नाही.

३.३ महामंडळाने व्यक्त केलेल्या अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली आहे.

३.४ याप्रकरणी गृहनिर्माण विभाग व शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने ६ जुलै, २०११ रोजी गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव तसेच झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली. " खाजगी विकासकांना वित्तीय सहाय्य " या सदराखाली वितरीत करण्यात आलेल्या कर्जातील व्याजामध्ये देण्यात आलेली सवलत या महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपाबाबत वस्तुस्थिती विषद करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, शिवशाही पुनर्वसन प्रकल्पामध्ये दोन प्रकारची कामे झाली असून, काही कामे स्वतः विकासक म्हणून केली असून, व काही कामे काही कंपन्याना रक्कम देवून केली गेली आहेत. त्यापोटी त्यांना देण्यात आलेले कर्ज याचे अपेक्षित परंतफेड होत नसल्याने याप्रकरणी वन टाईम सेटलमेंटचा निर्णय शासनाने घेतला. व्याजाच्या दरामध्ये सवलत देवून पैसे वसूल करावयाचे होते. ते सर्व पैसे वसूल करण्यात आले आहेत असे त्यांनी सांगितले. पुढे वस्तुस्थिती अधिक स्पष्ट करताना शिवशाही पुर्नवसन कंपनी सचिव यांनी सांगितले की, ३० विकासकांना ५३६ कोटीचे कर्ज मंजूर केले. त्यापैकी ७३.८५ कोटी त्यांना दिले गेले होते व त्यावर १७.५० टक्के व्याज दर होता. व्याजाची आकारणी उच्च दराने होत असल्याचे निवेदन मा. मुख्यमंत्री तथा शिवशाही पुर्नवसन प्रकल्पाचे अध्यक्ष या नात्याने विकासकांनी त्यांच्याकडे सादर केल्यामुळे पैसे वसूल होण्याच्या

दृष्टीने व्याज दर १० % वरती आणण्यात आला. व त्यानुसार सर्व कर्जाची रक्कम वसूल झालेली आहे. १७.५० % व्याजदराने कर्ज वितरीत केल्यानंतर त्याची वसूली १० % व्याज दराने केली गेल्यानंतर समितीला याबाबत विचारणा करणे योग्य आहे की नाही त्यावर विभागीय सचिव यांनी सांगितले की, संचालक मंडळाने तसा निर्णय घेतला होता. याप्रकरणी घेतलेला निर्णय विचारांती व नुकसान होवू नये व यातील रक्कम त्वरेने परत मिळण्याच्या दृष्टीने घेण्यात आला होता असे विभागीय सचिवांनी साक्षीच्या शेवटी स्पष्ट केले.

### ३.५ अभिप्राय व शिफारशी :

**शिवशाही पुनर्वसन प्रकल्पामार्फत मंजूर काही योजना खाजगी विकासामार्फत कार्यान्वीत करावयाच्या होत्या. या योजनेच्या जमिनीचे हक्क सदोष असल्यामुळे विकासक खुल्या बाजारातून निधी उभारु शकले नाहीत. म्हणून सदर योजनेला शासनाने कर्ज मंजूर केले व त्याकरीता शासनाने १४ % दराने बाजारामधून कर्ज घेवून ते प्रथम १७.५० % दराने व्याज आकारुन विकासकास दिले. परंतु सदर व्याजदर हा जास्तीचा असल्याने त्यावर फेरविचार करण्याची प्रकल्प व्यवस्थापनाला विकासकांनी विनंती केली. त्यानुसार संचालक मंडळाने निर्णय घेवून १० % दराने व्याज आकारुन एकत्रीत रित्या रक्कम भरण्यास विकासकांना मुभा दिल्यामुळे सदर रक्कम वसुल झाली असली तरी या व्यवहारात कंपनीस ४ % व्याजदराच्या फरकाच्या रक्कमेचे आर्थिक नुकसान झाले ही वस्तुस्थिती आहे. हे विचारात घेता यापुढील काळात असा निर्णय घेताना कंपनीचे आर्थिक नुकसान होणार नाही याकडे अधिक लक्ष देवून निर्णय घ्यावेत जेणेकरुन शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाअंतर्गत उभारण्यात येणा-या निवासी संकुलाला अर्थसहाय्य उपलब्ध होवून योजना अधिक फलदाई होण्यास त्याचा उपयोग होवू शकेल अशी समितीची शिफारस आहे.**

## चार : नियोजन

४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.१२ मध्ये "नियोजन" यासंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, कंपनीच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना राज्य शासनाने, मुंबई प्रदेशात आवश्यक असलेल्या आठ लाख घरांपैकी प्रारंभी दोन लाख घरे एसआरए योजनेखाली झोपडीधारक/प्रकल्प बाधितांना डिसेंबर १९९९ पर्यंत मोफत पुरवण्याचा निर्णय घेतला (सप्टेंबर १९९८) २२५ चौरस फुटांचे चटई क्षेत्र असलेले मोफत वाटायचे गाळे खाजगी विकासक आणि शासकीय अभिकरणांनी बांधायचे होते. अंमलबजावणी करणा-या अभिकरणांना मोफत गाळयांचा बांधकाम खर्च अतिरिक्त बांधकामाची/एसआरए योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या टीडीआरची विक्री करून भागवायचा होता. राज्य सरकारने कंपनीला २५००० घरे निजी योजना म्हणून बांधायचा निर्देश दिला होता (सप्टेंबर १९९८) हया निर्णयाच्या आधारावर बांधकाम कंत्राट खाजगी विकासकांना बहालकरुन १० एसआरए योजनांची अंमलबजावणी करण्याची योजना आखली (१९९८-९९) कंपनीच्या



सर्वकष पर्यवेक्षणाखाली प्रकल्प व्यवस्थापन समंत्रक (पीएमसी) तांत्रिक बाजूकडे लक्ष देणार होते. वेळोवेळी दुरुस्ती करण्यात आलेले बृहन्मुंबईसाठी विकास नियंत्रण नियमन १९९१ पुनर्वसन/प्रकल्प बाधितांच्या गाळयाचे बांधकाम व विक्रीयोग्य घर/टीडीआर निकष करार निविष्ट करत होते. वर म्हटलेल्या नियमनाखाली विहित केलेल्या निकषानुसार मुंबई शहरात पुनर्वसन विक्री योग्य घटकांचे गुणोत्तर १:०.७५ होते, उपनगर क्षेत्रात ते १:१ आणि धारावी सारख्या समस्याप्रधान क्षेत्रांसाठी ते १:१.३३ होते. बांधकामाच्या जागेवर उपयोगात आणायचा महत्तम चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) २.५ होता. जर मंजूर केलेला एफएसआय (२.५) पेक्षा जास्त असेल तर मंजूर केलेला एफएसआय व विहित महत्तम एफएसआय २.५ यामधील तफावत टीडीआर म्हणून धरायची होती. विक्री योग्य घटकांच्या विकासामध्ये कांही बाधा येत असेल तरी टीडीआरचा पर्याय उपलब्ध होता. हया अनुषंगाने, लेखापरीक्षेला खालील प्रमाणे आढळून आले :—

- ★ हया योजनांची वर्ष १९९८-९९ सुरवात करतेवेळी, कंपनीने स्वतःच्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी सर्वकष मार्गदर्शिका तयार केल्या नव्हत्या.
- ★ जरी बांधकाम कंत्राट खाजगी असामींना बहाल केले होते आणि डिसेंबर, २००० पर्यंत बांधकाम पूर्ण होण्याचे अपेक्षित होते, तरी आरंभिक समस्यामुळे अशा जागेच्या ठिकाणी प्रवेश सुगमता, झोपडया हटवणे इत्यादी कारणामुळे कंपनी बांधकामाचे वेळापत्रक पाळू शकली नाही.
- ★ कंपनीने योजनेची सुरवात करण्याआधी प्रकल्प अंमलबजावणी अभिकरणांकडून प्रकल्प बाधितांच्या गाळयाच्या मागणीचे निर्धारण करण्यास कोणताही प्रयास केला नाही. कंपनीला प्रकल्प अंमलबजावणी अभिकरणाकडून वाटप न झालेल्या गाळयाच्या मागणी निर्धारणाच्या प्रतिसंभरणाची प्रतिक्षा करावी लागली होती.
- ★ कंपनीला कार्यान्वयन दरम्यान प्रकल्प बाधितांच्या गाळयांच्या संख्येत व विक्री योग्य घरे/टीडीआरच्या क्षेत्रात बदल करून, पाच योजनेत (अॅन्टॉप हिल, दिंडोशी, शेड कॉम्प्लेक्स, राहूल नगर व तुर्भे-मंडाले योजना) वारंवार (दोन ते सहा वेळा) फेरबदल करावा लागला होता. म्हणून कंपनीचा नियोजनाकडे पाहण्याचा दृष्टीकोण तदर्थ होता व व्यवस्थित नव्हता. असा दृष्टीकोन अंमलबजावणीच्या विलंबास कारणीभूत झाला होता. तीन योजना (राहुल नगर, शेड कॉम्प्लेक्स आणि तुर्भे-मंडाले) अजून पूर्ण व्हायच्या होत्या (नोव्हेंबर २००८)
- ★ कंपनीने योजनेनुसार खर्चाचे अंदाज तयार केले होते, तर योजनेत वारंवार केलेल्या फेरबदलामुळे अंदाजात मोठे बदल करावे लागले होते यामुळे मूळ अंदाजित खर्चाची प्रत्यक्ष खर्चाशी तुलना होऊ शकत नव्हती.
- ★ खेळत्या भांडवलाच्या आवश्यकतेचे योग्य नियोजन केले नव्हते. त्याची परिणिती कंपनीच्या वित्तीय चणचणीत झाली होती.
- ★ वर्ष १९९८-९९ नंतर कंपनीने कोणतीही नवीन योजना अंमलबजावणीसाठी हाती घेतली नव्हती.

४.२ : याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमुद केले की, कंपनी स्थापना झाल्यानंतरच्या थोडयाच काळात इतक्या निजी योजना राबविण्यासाठीचा कर्मचारीवृंद व संगठण सामग्री कंपनीकडे उपलब्ध नसल्यामुळे तसेच अत्यंत अल्प कालमर्यादेत उदिष्ट साध्य करायचे असल्यामुळे कंपनीने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या नेमणूका केल्या. कंपनीकडे इतक्या अल्प कालावधीत व स्वल्प सामग्री उपलब्ध असताना योजनांचे काटेकोर पूर्व नियोजन व आखीव नियंत्रण करण्यास लेखापरीक्षक म्हणतात तेवढा कालावधी व वाव सुध्दा नव्हता. परंतु उपलब्ध कर्मचारी व सामुग्री यांचे एकात्म व समर्पणपणे विनियोग मात्र केला. कंपनीने हाती घेतलेल्या १० योजनांपैकी ७ योजना पूर्ण करण्यात आल्या असून उर्वरित ३ योजना पूर्णत्वाच्या मार्गावर असून ३-४ महिन्यात त्या पूर्ण करण्यात येत आहेत. या १० योजनांतील १०६७३ घरांपैकी ८९५८ घरे पूर्ण करण्यात आली. कंपनी ही मूळातच म्हाडाची प्रशाखा गणली जात आहे. झोपडपट्टी पुर्नवसनाच्या कामांना प्राथम्य घ्यायचे हे त्यावेळच्या शासनाच्या धोरणाला अनुसरुन म्हाडा कार्यप्रणालीहून स्वतंत्र कंपनी माध्यमातून द्रुतगती मिळण्यासाठी कंपनी स्थापण्यात आली व बहुतांशी अधिकारी व कर्मचारी वर्ग म्हाडामधून कंपनीत प्रतिनियुक्ती कार्यरत आहेत. कंपनीच्या अंतर्गत कार्यपध्दतीची मार्गदर्शिका (work flow and responsibilities) ही कंपनी सुरु झाल्यापासूनच (सन १९९८ सालीच) बनविण्यात्त आली होती. त्यानुसारच कंपनीचे कामकाज चालू आहे. हे खरे आहे. १९९९ पासूनच शिपुप्रम चे व्यवस्थापकीय संचालक, सहव्यवस्थापकीय संचालक यांनी तुर्भे मंडाले, दिंडोशी व वडाळा येथील पुनर्वसनाच्या प्रकल्पांसाठी अत्यावश्यक नागरी प्रकल्प बाधित झोपडीधारकांची निश्चिती (Identification) करण्यासाठी रेल्वे, एअरपोर्ट ऑथेरीटी व एमएमआरडीए यांचे बरोबर वेळोवेळी चर्चा केली. त्यामुळेच एअर पोर्ट ऑथेरिटीच्या जरीमरी येथील टॅक्सी वे ला बाधित झोपडीधारकांचे पुनर्वसन दिंडोशी येथील प्रकल्पात, हार्बर रेल्वे लाईनवरील माहिम जंक्शन ते किंग्ज् सर्कल या स्थापकां दरम्यान रेल्वे रुळालगतच्या झोपडीधारकांचे पुनर्वसन धारावी येथे अतिथी बिल्डर्स यांनी शिपुप्रलि बरोबर संयुक्त उद्यमा मधून राबविलेल्या योजनेत, तसेच एमएमआरडीएच्या एमयुटीपीच्या प्रकल्पातील बाधीत झोपडीधारकांचे पुर्नवसन वडाळा येथील झोपडपट्टी पुर्नवसन योजनेत होऊ शकले. त्यामुळे कंपनीने योजनेची सुरुवात करण्याआधी प्रकल्प अंमलबजावणी अभिकरणांकडून (PIA) प्रकल्प बाधितांच्या गाळयांच्या मागणीचे निर्धारण करण्यात कोणताही प्रयास केला नाही हा महालेखापरीक्षकांचा आक्षेप बरोबर नाही. कंपनीकडे शासनाने पूर्ण ६०० कोटी रुपयांचा निधी भाग भांडवल म्हणून द्यावयाचा होता. परंतु प्रत्यक्षात फक्त ११५ कोटी रुपयेच शासनाने कंपनीस दिले. त्यामुळे कंपनीने स्वतः हाती घेतलेली कामे व खाजगी विकासकांच्या कामांना निधी उपलब्ध करून देता आला नसल्यामुळे या कामांना खीळ बसली. निधी अभावी योजनांमध्ये आर्थिकदृष्टया सक्षम होण्यासाठी फेरबदल करावे लागले. सदर तीनही योजना येत्या ३-४ महिन्यात पूर्ण होतील. शिपुप्रलिकडे आर्थिक निधीचा तुटवडा असल्या कारणाने योजना आर्थिकदृष्टया फायदेशीर बनविण्यासाठी योजनांमध्ये मोठे बदल करावे लागले. त्यामुळे मूळ अंदाजित खर्चाची प्रत्यक्ष खर्चाशी तुलना होऊ शकत नाही. शासनाकडून प्राथमिक कालात प्राप्त झालेल्या भाग भांडवल भरणानंतर पुढील भाग भांडवल मिळाले



नाही. हुडकोकडून कर्ज घेण्याकरिता शासन हमी मंजूरीत कर्जापेक्षा खूपच कमी मिळाल्यामुळे पूर्ण कर्ज सुध्दा प्राप्त झाले नाही. तसेच बांधणी प्रकल्पासारखे दीर्घ मुदतीच्या प्रकल्पास बराच वेळ लागतो व त्यामुळे परताव्याची शक्यतेलाही वेळ लागतो. त्यामुळे वित्तीय तुटवडा कायम स्वरुपी असतांना खेळत्या भांडवलाच्या नियोजनाचा अभाव हा लेखा परिक्षकांचा आक्षेप स्विकारार्ह नाही. कारण दीर्घ व खेळते भांडवलच उपलब्ध नव्हते. त्यामुळे नियोजन करणे शक्य नव्हते. कारण कंपनीला शासनाने नेमून दिलेल्या योजनांची अमंलबजावणी संस्थापन नियमावलीच्या आधीन राहून करावयाची आहे.

४.३ महामंडळाने व्यक्त केलेल्या अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली आहे.

४.४ याप्रकरणी गृहनिर्माण विभाग व शिवशाही पुर्नवसन प्रकल्प मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने ६ जुलै, २०११ रोजी गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव तसेच झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली. "कंपनीच्या झोपडपट्टी पुर्नवसन योजना" याबाबत महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपासंबंधाने वस्तुस्थिती स्पष्ट करतांना विभागीय सचिवांनी सांगितले की, ही योजना एका मुदतीत संपावयास पाहिजे होती. पण ती पुर्ण होवू शकली नाही. यामध्ये नियोजन चुकले आहे हे त्यांनी मान्य केले. झोपडपट्टी पुनर्वसन योजना अत्यंत गुंतागुंतीची व कठीण स्वरुपाची आहे. यामध्ये पात्रता ठरविणे व त्यासंबंधी असलेली कार्यपध्दती ठरविणे व ती पडताळण्यासाठी सक्षमप्राधिका-यांची नेमणूक झाल्यानंतर व त्याबाबतची तपासणी पूर्ण झाल्यानंतर तेथील निवासी लोकांना दुस-या ठिकाणी स्थलांतरीत करावे लागते. त्याशिवाय योजनेच्या कामास सुरवात करता येत नाही. धारावी येथील सेक्टर पाचची योजना आपण करीत आहोत यामध्ये नियोजन करताना सर्वच गोष्टीचा समावेश करता येणे शक्य नसते. काही गोष्टी अनवधानाने देखिल घडलेल्या आहेत असे त्यांनी स्पष्ट केले. एकुण ७७४० निवाशी गाळे बांधावयाचा कार्यक्रम हाती घेतला होता. त्यातील ५२२१ घरे बांधून पुर्ण झाली व ती वितरीत देखिल करण्यात आली. २५१९ गाळे बांधुन त्यांचे वाटप करण्यात आलेले आहे. यामध्ये जवळ-जवळ ९० टक्क्याहून अधिक गाळे बांधुन पूर्ण केले आहेत. असे मुख्य अभियंता शिवशाही पुर्नवसन प्रकल्प यांनी समिती सदस्यांच्या एका प्रश्नाला उत्तर देताना स्पष्ट केले. या इमारती तळ मजला अधिक सात मजल्याच्या असल्याने त्यामध्ये उद्वाहनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. इमारतीमधील गाळे धारकाने एकत्रीतरित्या गृहनिर्माण सहकारी संस्था स्थापन केली असली तरी त्या सक्षमरित्या चालविल्या जात नाहीत यामध्ये संस्था चालविण्याचा अनुभव नसल्याने ही बाब निदर्शनास येते. यापुर्वी प्रत्येक घराकरीता वीस हजार रुपये फंड जमा केला जात होता व त्यांच्या व्याजापोटी असलेल्या रक्कमेतून देखभालीचे काम केले जात होते. एकंदरीत त्यांना गृहनिर्माण संस्था चालविण्यासाठी प्रशिक्षण देवून योग्यरितीने देखभाल होण्यासाठी आवश्यकता असल्याचे दिसून येते. वीस हजार रुपये फंड हा गेल्या दहा वर्षापुर्वीचा असल्याने त्यामध्ये आता दुपटीने म्हणजे ४० हजार रुपयापर्यंत वाढ केलेली आहे. सहकारी संस्था स्थापन झाल्यानंतर सदर फंड त्यांच्या गृहनिर्माण संस्थेच्या देखभालीसाठी ताब्यात द्यावयाचा आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुर्नविकास

प्राधिकरण यांनी प्रश्नांच्या उत्तरादाखल स्पष्ट केले. लहानशा जागेमुळे विकासकाला झोपडपट्टी धारकांसाठी इमारत बांधावी लागते. व उपलब्ध असलेल्या जागेतून त्याला फ्री सेल साठीदेखिल इमारत बांधावी लागते म्हणून विकासक २२-२३ मजल्याच्या इमारती बांधतात परंतू यापुढील काळात इतक्या उंच इमारती बांधल्या जाणार नाहीत, असे विभागीय सचिवांनी एका प्रश्नाच्या उत्तरादाखल स्पष्ट केले. दिनांक १६ एप्रिल, २००८ रोजी शासनाने २२५ चौरस फुट जागेवरुन २६९ चौरस फुट निवाशी घर देण्याचा निर्णय घेतला आहे. व त्यासाठी २५ टक्के एफ.एस.आय. मध्ये देखिल वाढ देण्यात आल्यामुळे बहूमजली इमारती बांधण्यात येतात. असेही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी स्पष्ट केले. मुंबई शहरामध्ये एकूण लोकसंखेच्या ६० टक्के लोक झोपडपट्टीमध्ये रहात असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी साक्षीच्या शेवटी सांगीतले.

**४.५ अभिप्राय व शिफारशी :**

**राज्य शासनाने मुंबई प्रदेशात झोपडपट्टी पुनर्विकास योजनेखाली झोपडपट्टी धारक/प्रकल्पबाधीतांना मोफत घरे पुरविण्याचा निर्णय घेतला होता व यासाठी प्रकल्प व्यवस्थापन समंत्रक म्हणून तांत्रिक बाजूकडे लक्ष देण्यासाठी नेमणूक केली गेली होती. या योजनेच्या अमंलबजावणीसाठी अल्पकालावधी व स्वल्पसामुग्री उपलब्ध असल्यामुळे नियोजनामध्ये अभाव होता. त्यामुळे ठरलेल्या मुदतीमध्ये सदर काम पुर्ण होवू शकले नाही हे समिती समोर आलेल्या माहितीवरुन स्पष्ट होते. तसेच निवासी गाळे पुर्ण झाल्यानंतर गृहनिर्माण सहकारी संस्था उभारुन त्यांची देखभाल करण्याची आखणी केलेली होती. परंतु सदर ठिकाणी गाळेधारकांच्या सहकारी संस्था स्थापन न झाल्यामुळे इमारतींच्या देखभालीकडे देखिल दुर्लक्ष झाले. वास्तविकतः झोपडपट्टी पुर्नवसन योजनेअंतर्गत झोपडपट्टीवासींयासाठी पक्की घरे बांधून झोपडपट्ट्यांचे निर्मुलन करणे हा मुख्य उद्देश ही योजना सुरु करण्यामागिल होता. घाईघाईने ही योजना राबविली गेल्यामुळे, नियोजनाच्या अभावाने व पर्यायाने योजनेची फल निष्पत्ती पूर्णपणे होवू शकले नाही, असे समितीचे मत आहे. तरी पुढील काळात झोपडपट्टी निर्मुलन सारख्या महत्वपूर्ण योजना राबविताना अत्यंत बारीक-सारीक बारकाव्यांचा साकल्याने विचार करावा, तसेच अपूर्ण योजना तातडीचे पूर्ण कराव्यात व या योजनेअंतर्गत इमारतीच्या देखभालीसाठी देखील नियोजनबद्ध उपाययोजना कराव्यात अशी समितीची शिफारस आहे. याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी.**

**पाच : वर्ष १९९९-२००२ दरम्यान पूर्ण झालेल्या योजना**

**५.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.१४ मध्ये " वर्ष १९९९-२००२ दरम्यान पूर्ण झालेल्या योजना " यासंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, वर दिसल्याप्रमाणे, १७९१ गाळयांच्या बांधकामाचा समावेश असणा-या पाच योजना (अ.क्र.१ ते ५) सप्टेंबर १९९८ ते नोव्हेंबर, २००२ दरम्यान पूर्ण केल्या होत्या बांधकाम पूर्ण होण्याच्या अनुसूचित दिवसाच्या तुलनेत, बांधकाम प्रत्यक्ष पूर्ण होण्यात एक ते २३ महिन्याचा विलंब झाला होता.



अँन्टॉप हिल, वडाळा योजनेच्या प्रकरणी कामाच्या व्याप्तीत सहा पुनर्वसन इमारती व तीन विक्रीयोग्य इमारती ऐवजी नऊ पुनर्वसन इमारती (६९६ गाळे) व एक विक्री योग्य इमारत (२३८ गाळे) अशी सुधारणा करण्यात आली (डिसेंबर १९९९) होती. कंत्राटातील अटीप्रमाणे जर निविदेत समाविष्ट केलेले संपूर्ण काम कार्यादेश जारी केलेल्या तारखेपासून (६ ऑगस्ट १९९९) मध्ये १५ महिन्याच्या ठरलेल्या कालावधी आधी पूर्ण केल्यास दर महिन्याला १५ रुपये प्रति चौरस फुट या दराने बोनस प्रदान करावयाचा होता. शर्तीमध्ये असे करार निर्विष्ट केले होते की कंत्राटदार किंवा नियोक्त्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणास्तव कालावधीत वाढ होत असेल तर बोनस मिळणार नव्हता. तथापि प्रत्येक इमारतीच्या बांधकामाच्या व्याप्तीमध्ये सुधारणा केल्याच्या तारखेपासून हा १५ महिन्याचा कालावधी धरुन पाच इमारतीच्या (ए-१, ए-४, बी-१, सी-१ व एस-१) वैयक्तीक बांधकाम पूर्ण होण्याच्या आधारावर कंपनीने रुपये ६६.६६ लाखाचा बोनस दिला होता (एप्रिल-ऑगस्ट २००३) बोनसचे प्रदान अनियमित होते कारण की कंत्राटातील अटीप्रमाणे संपूर्ण प्रकल्प पूर्ण होण्याची तारीख विचारात घेण्याऐवजी वैयक्तिक बांधकाम पूर्ण होण्याची तारीख विचारात घेऊन वर सांगितलेल्या पाच इमारतीपैकी प्रत्येकासाठी स्वतंत्रपणे हे प्रदान केले होते. व्यवस्थापनाने त्यांच्याउत्तरात (जुलै २००८) ज्याची शासनाने पुष्टी केली होती (डिसेंबर २००८) असे म्हटले की प्रकल्पात ब-याच वेळी फेरबदल केले होते व अंमलबजावणी टप्या टप्यात झाली होती. म्हणून वैयक्तिक इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर बोनस प्रदान करण्यात आला होता. उत्तर मुद्दयाला धरुन नव्हते, कारण बोनसचे प्रदान कंत्राटातील अटीच्या विपरित होते आणि कंपनीने सुध्दा सुरवातीला दावा अमान्य केला होता.

**५.२** याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमुद केले की, शिवप्रसाद योजनेमध्ये पोच रस्ता अरुंद असल्याकारणाने, कंत्राटदार देयकांची रक्कम उशिरा दिल्यामुळे, महापालिकेने ऑक्झीलरी वॉटर टँक बसविण्यास सांगितल्याने कामास दिरंगाई झाली. अँटॉपहिल वडाळा येथील योजनेमध्ये झालेल्या विलंबाची कारणे पुढील परिच्छेदात समाविष्ट आहेत

अँटाप हिल, वडाळा येथील १० इमारतींचे (९ पुनर्वसन व १ विक्री) बांधकाम कंत्राटदार मेसर्स बी.जी. शिर्के कन्स्ट्रकशन प्रा.लि. या कंपनीला ऑगस्ट १९९९ मध्ये देण्यात आले व सदर काम १५ महिन्यात (नोव्हेंबर २०००) पूर्ण करावयाचे होते. परंतु शिपुप्रलिकडे असलेल्या अपु-या निधीमुळे, प्रकल्पामध्ये केलेल्या फेरबदलामुळे व प्रकल्पाचे जागेवरील अडचणींमुळे कंत्राटदारास हया १० इमारतींचे बांधकाम टप्प्या-टप्प्याने देण्यात आले. त्यानुसार काम देण्यात आलेल्या तारखेपासून १५ महिन्यांच्या आत ५ इमारती (४ पुनर्वसन व १ विक्रीची) कंत्राटदाराने पूर्ण केल्या. कालावधीच्या आधी काम पूर्ण केल्यावर बोनस प्रदान करण्याची तरतूद करारनाम्यात असल्या कारणाने करारनाम्यातील कलम क्र. ४७.३ अनुसार व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी (PMC) तद्नुषंगे दिलेल्या शिफारस प्रमाणपत्रानुसार तसेच व्यवस्थापनाने प्रत्येक इमारतीस १५ महिन्यांचा कालावधी मान्य केल्यानुसार कंत्राटदारास ५ इमारतींसाठी रु. ६६.६६ लक्ष बोनस प्रदान करण्यात आला. त्यामुळे महालेखापरिक्षक

(शा.म.मु.) एचबी १२४८—४ (६५०—८-११)

यांनी घेतलेला आक्षेप बरोबर नाही. त्यावेळच्या शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन कामास शीघ्र प्राथम्य दिले होते. त्यासाठी बोनस देण्याची तरतूद करारनाम्यात केली होती. बोनस देण्याच्या तरतूदीमुळे कंत्राटदार काम लवकर पूर्ण करण्यास अग्रक्रम देतात व करारनाम्यात तसा अंर्तभाव असल्यामुळे कंत्राटदारास बोनस द्यावा लागला.

५.३ महामंडळाने व्यक्त केलेल्या अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली आहे.

५.४ याप्रकरणी गृहनिर्माण विभाग व शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने ६ जुलै, २०११ रोजी गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव तसेच झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली. अॅन्टॉप हिल, वडाळा येथील शिवशाही प्रकल्प योजनेच्या कामाबाबत व्यवस्थापन सल्लागार म्हणून कोणाची नेमणूक करण्यात आली होती व त्यांना पाच इमारतींच्या कामासाठी ६६.६६ रुपये बोनस म्हणून प्रदान करण्यासाठी कोणते निकष लावण्यात आले होते. या समितीप्रमुखांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, वडाळा याठिकाणी चार पुनर्वसनाच्या आणि एक विक्रीची अशा पाच इमारतीचे बांधकाम करावयाचे होते. करारातील कलम ४७.३ तरतुदीनुसार कालावधीच्या आधी काम पुर्ण केल्यावर बोनस प्रदान करण्याची तरतुद होती. सदर काम १५ महिन्याच्या कालावधीत पुर्ण झाले होते. त्यामुळे बोनस अदा केला गेला. बोनस प्रदान केला नसता तर सदर प्रकल्पाकरता साधारणपणे ८० लाख रुपया पर्यंतची रक्कम दयावी लागली असती त्याऐवजी ६६ लाख रुपये बोनस दिला गेल्यामुळे कंपनीचे आर्थिक नुकसान झालेले नाही. असे त्यांनी आपल्या उत्तरादाखल नमुद केले. ४७.३ हे करारातील बोनससाठी नमुद असलेले कलम संपूर्णतः विकासकाच्या हिताचे असून, त्यामुळे विकासकाकडून या कलमाच्या आधारे गैरफायदा घेण्याचीच जास्त शक्यता असते. या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, या सुचनेचा जरुर विचार करु करारामध्ये सदर कलम ठेवावयाचे की नाही याचा साकल्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

५.५ अभिप्राय व शिफारशी :

**अॅन्टॉप हिल, वडाळा येथील शिवशाही पुनर्वसन प्रकल्प योजनेतील इमारतींसाठी प्रथम सहा पुनर्वसन इमारती व तीन विक्री योग्य इमारत बांधावयाची होती. त्याऐवजी त्यामध्ये बदल करून ९ पुनर्वसन इमारती व एक विक्री योग्य इमारत बांधण्याबाबत सुधारणा करण्यात आली. यासाठी करण्यात आलेल्या करारामध्ये नमुद असलेल्या ४७.३ या कलमानुसार कार्यादेश जारी केलेल्या तारखेपासुन म्हणजे ६ ऑगस्ट, १९९९ पासुन १५ महिन्याच्या कालावधीआधी काम पुर्ण केल्यास बोनस अदा करण्याची तरतुद करण्यात आलेली होती. यासाठी करारातील अटी प्रमाणे संपुर्ण प्रकल्प पुर्ण होण्याची तारीख विचारात न घेता पाच इमारतीसाठी वैयक्तिक बांधकाम पुर्ण होण्याची तारीख विचारात घेवून त्याप्रमाणे प्रत्येक विकासकाला बोनस म्हणून स्वतंत्रपणे रक्कम अदा केली होती. या महालेखाकारांनी घेतलेल्या मुळ आक्षेपाबाबत विभागाकडून उत्तर देताना सांगितलेल्या वस्तुस्थितीनुसार बोनस अदा करताना खर्चापोटी दयावयाच्या रक्कमेचा काल्पनिक दृष्टया विचार करून जास्त रक्कम दयावी लागत असल्याचे विभागाने केलेले समर्थन योग्य वाटत नाही. विभागाने देखिल करारामध्ये बोनस म्हणून दयावयाच्या रक्कमेसाठीचे कलम हे संपुर्णतः विकासकाच्या हिताचे असल्याचे मान्य केले असल्याने तसेच त्याबाबत विकासक गैरफायदा घेण्याची शक्यता असल्याने सदर कलम पुढील काळात करारामध्ये ठेवावयाचे की नाही याचा पुर्नविचार करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. अतः भविष्य काळातील अशा बांधकाम करावयाच्या कामासाठी करण्यात येणा-या करारामध्ये कंपनीस विनाकारण बाधक ठरणा-या अश्या कलमाचा समावेश करु नये अशी समिती शिफारस करीत आहे. याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी.**



सहा : सेवाकरांची अनियमित प्रतिपूर्ती

६.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.१९ मध्ये "सेवाकरांची अनियमित प्रतिपूर्ती" यासंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, कराराप्रमाणे समंत्रणा फी प्रकल्प खर्चाच्या १.५ ते २.२५ टक्के दराने वास्तुरचनाकारांना प्रदान करायची होती आणि फीच्या दराने सर्व कर समाविष्ट होते. लेखापरीक्षेला असे आढळून आले की, वरील अट असून सुध्दा कंपनीने सेवाकर हा अप्रत्यक्ष कर होता व सेवा प्राप्त करणारा सेवा करांची प्रतिपूर्ती करण्यास बाध्य होता. या धर्तीवर कंपनीने सेवाकराची रुपये ८.३१ लाखाची प्रतिपूर्ती २ वास्तुरनाकारांना (प्रेमनाथ अॅन्ड असोसिएटस - रुपये ५.४२ लाख आणि मुकेश मेहता - रुपये २.८९ लाख) ऑगस्ट २००४/मार्च २००६ मध्ये केली होती. ही प्रतिपूर्ती अनियमित होती. कारण की प्रतिपूर्ती करार बांधीलकीच्या व्याप्तीच्या बाहेर होते. हया शिवाय हे दावे कंपनीच्या संयुक्त व्यवस्थापकीय संचालक/व्यवस्थापकीय संचालकानी स्वीकृत केले नव्हते. व्यवस्थापनाने त्यांच्या उत्तरात (सप्टेंबर २००८) याची शासनाने पुष्टी केली होती (डिसेंबर २००८) असे म्हटले होते की, सेवाकर हा अप्रत्यक्ष कर आहे व सेवा पुरविणारा सेवाकर वसुल करण्यास बांधिल होता हे उत्तर स्विकारण्यायोग्य नाही. कारण की, समंत्रकाने फी मध्ये सर्व कर समाविष्ट असल्याचे स्विकारले होते. पीएमसीच्या नेमणूकीच्या अटी वास्तुरचनाकाराच्या नेमणूकीच्या अटी सारख्याच असून सुध्दा पीएमसीला मात्र अशा प्रकारची प्रतिपूर्ती केली नव्हती.

६.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमुद केले की, लेखापरिक्षकांच्या मते करारनाम्यातील ज्या तरतूदीचा भंग केला असल्याचे आक्षेप आहे ती तरतूद मूळात हयाप्रमाणे आहे, All taxes such as service charges, professional fees etc. should be borne by the Architect Consultant (सर्व कर जसे की, सेवा खर्च, व्यावसायिकांना फी, वगैरे, वास्तुरचना सल्लागाराने सोसायचा आहे.) हया तरतूदीचे संपूर्ण आकलन केल्यावर असे स्पष्ट होते की, तरतूदीच्या दुस-या भागात पहिल्या भागातील उद्देशित "कर" कुठल्या प्रकारचे आहेत याचे स्पष्टीकरण दिले आहे. सेवा खर्च वा व्यावसायिक फी वगैरेचा भार हा शासन/प्राधिकरण इ.नी बसविलेले कर या सदरात बसत नाहीत. तरतूदीच्या केवळ एका

(" सर्व कर ") भागाचाच विचार करणे बरोबर नाही. ज्या अर्थी दुसरा भाग समाविष्ट केला आहे त्याअर्थी पहिल्या भागातील कर म्हणजे काय याचे स्पष्टीकरण दुस-या भागात करायचे आहे. हया तरतूदीद्वारे वास्तुरचना सल्लागाराने अशा प्रकारचा (शासन/प्राधिकरण अंगीकृत नसलेला) खर्च करून त्याचा परतावा मागू नये असे अभिप्रेत आहे. नाहीतर त्या तरतूदीत केवळ " सर्व कर " असे म्हटले असते अथवा " जसे की (such as) " च्या ऐवजी " includion (सहित) " असे म्हटले असते. म्हणून दुस-या भागाचा समावेश करून त्या तरतूदीचा अर्थ लावणे जरुर आहे. तसेच, सेवा कर हा अप्रत्यक्ष कर केंद्र शासनाने लागू केला असून इतर सर्व अप्रत्यक्ष करात अभिप्रेत असल्याप्रमाणे त्याचा भार अंतिमतः अंतिम उपभोक्त्यावर असावा व त्याप्रमाणे तो कर पुरवठादाराने उपभोक्त्याकडून वसूल करायचा त्याला अधिकार असतो. म्हणून सेवा कराची प्रतिपूर्ती, करारनाम्यातील सदर संपूर्ण तरतुदीनुसार तसेच सेवा कर हया अप्रत्यक्ष करामध्ये त्याच्या अंतिम भारासाठी अभिप्रेत असलेल्या तत्वप्रणालीप्रमाणे केला आहे. म्हणून मान्यता घेण्यात आली नाही.

पीएमसी व वास्तुरचनाकाराच्या नेमणूकीच्या अटी हे दोन्ही करारनामे वाचल्यानंतर स्पष्ट होते की, त्या सारख्या नाहीत. पी.एम.सी.च्या करारनाम्यात किमान २ ठिकाणी (खंडशः (clause) १.१० व परिशिष्ट " एफ " - चौथा परिच्छेद) स्पष्ट व स्वच्छ शब्दात म्हटले आहे की, वैधानिक वा सेवा कर पीएमसीने सोसायचा आहे म्हणून त्याची प्रतिपूर्ती देण्याचा प्रश्न येत नाही व तशी ती केलीही नाही. पीएमसीच्या सदर करारनाम्यातील परिशिष्ट जी मध्ये सुध्दा सदर आक्षेपित तरतूद देण्यात आली आहे. पण केवळ त्याच तरतूदीनुसार पीएमसीला सेवा कराची प्रतिपूर्ती केली नाही असे नाही. उपरोल्लेखित त्या दोन स्पष्ट तरतूदीच्या आधीन राहून सेवा कराची प्रतिपूर्ती पीएमसीला केली नाही.

६.३ महामंडळाने व्यक्त केलेल्या अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली आहे.

**६.४** याप्रकरणी गृहनिर्माण विभाग व शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने ६ जुलै, २०११ रोजी गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव तसेच झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली. " सेवाकरांची अनियमित प्रतिपुर्ती " या महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपाबाबत वस्तुस्थिती विषद करताना शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाचे उप अभियंता यांनी सांगितले की, काही अधिकारी एस.पी.पी.एल याठिकाणी ठेवण्यात आले होते. संचालक मंडळापुढे ही बाब ठेवण्यात आल्यानंतर सेवाकर वसुल करण्याचा निर्णय घेण्यात आला व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. उप अभियंता यांच्या उत्तराला पुष्ठी देताना विभागीय सचिवांनी देखिल सांगितले की, याबाबत संबंधितांना नोटीस देण्यात आलेली असून त्यांनी जी रक्कम अनामत म्हणून भरलेली आहे. त्यातुन ही रक्कम वसुल करता येईल व पुढील एक महिन्याच्या आत सदर कार्यवाही पुर्ण होईल. ज्यानी जादा सेवाकर देण्याचा निर्णय घेतला व दिला व त्याबद्दल संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय या समिती प्रमुखांच्या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, संबंधितांनी ही बाब जाणून बुजून केलेली नसून याबाबतीत महालेखाकारांनी आक्षेप घेतल्यानंतर



संचालक मंडळामध्ये यावरती चर्चा होऊन सदर रक्कम वसुल करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मात्र यापुढील काळात असे गैरप्रकार होणार नाहीत याची काळजी घेतली जाईल असे नमूद केले.

**६.५ अभिप्राय व शिफारशी :**

**शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाकडून करण्यात आलेल्या कराराप्रमाणे समंत्रणा फी प्रकल्प खर्चाच्या १.५ ते २.२५ टक्के दराने वास्तुरचनाकारांना प्रदान करावयास पाहिजे होती. सेवा कर हा अप्रत्यक्ष कर होता. व सेवा प्राप्त करणारा सेवाकरांची प्रतिपूर्ती करण्यास बांधील होता. व याप्रकरणी करण्यात आलेली प्रतिपूर्ती करार बांधिलकीच्या व्याप्तीच्या बाहेर होती. सदर बाब महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतर पुनर्वसन प्रकल्प अधिका-यांच्या निदर्शनास आली व तद्नंतर संचालक मंडळापुढे सदर प्रस्ताव सादर केला असता त्यांनी देखील सदरबाब मान्य करून परिपुर्तीची रक्कम वसूल करावी असा निर्णय घेतला. यावरुन असे दिसून येते की, ज्यादा सेवाकर अदा करताना शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाच्या संबंधित अधिका-यांनी याचा अभ्यासपूर्वक विचार न करता रक्कम अदा केली असल्याचे दिसून येत असल्याने याबाबत सखोल चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यानुसार कडक कारवाई देखील करण्यात यावी. तसेच परिपूर्ती केलेल्या रक्कमेची विभागीय सचिवांनी मान्य केल्याप्रमाणे एक महिन्याच्या आत संबंधीतांकडून वसुली करण्यात यावी. व यापुढील काळात अशा प्रकारची कार्यवाही टाळण्याच्या दृष्टीने सर्व बाबींचा सखोल अभ्यास करून निर्णय घेण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे. याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी.**

**सात : वसुलीच्या दिरंगाईमुळे व्याजाची हानी**

**७.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.२२ मध्ये " वसुलीच्या दिरंगाईमुळे व्याजाची हानी " यासंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, कंपनीने दिंडोशी व मालाड येथे एसआर योजनेखाली ३५४८ गाळयांचे (४५ सोयी सुविधांच्या गाळयांसहित २६५९ प्रकल्प बाधितांचे गाळे आणि ८८९ विक्री योग्य सदनिका) बांधकाम हाती घेतले (१९९८-९९) होते. कंत्राटदाराने विक्री योग्य सदनिकांचे सुमारे ९० टक्के बांधकाम पूर्ण केले होते (एप्रिल २००४) आणि त्यांच्या रुपये ६०.५५ कोटीच्या दाव्याची तडजोड कंपनीने न केल्यामुळे कंत्राटदाराने उरलेले काम पूर्ण करण्यास नकार (मे २००४) दिला होता. जानेवारी २००६ मध्ये कंपनीने करार समाप्त केला आणि जसे आहे जेथे आहे या तत्त्वावर या अपूर्ण सदनिकांची विक्री करण्यासाठी देकार मागितले (मे २००६) कंपनीला चार संस्थांकडून प्रतिसाद मिळाला. (मे २००६) मंत्रीग्रुप सर्वोच्च बोलीदार होते व त्यांनी रुपये १०२ कोटीची बोली लावली होती.

संचालक मंडळाने देकाराला अंतिम रुप देण्याकरीता उपसमिती गठित करण्याचा निर्णय घेतला. (ऑक्टोबर २००६) समितीने मंत्री ग्रुपच्या देकारावर वाटाघाटी केल्या आणि २९ नोव्हेंबर, २००६

ला बोलीदाराने वर्ष २००६ च्या रेडी रेकनर दरावर आधारित रुपये १२० कोटीच्या देकारास स्वीकृती दिली होती. स्विकृती बोलीदाराल ४ जानेवारी २००७ रोजी कळविण्यात आली होती. निविदा शर्तीनुसार, देयक स्विकारण्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आंत बोलीदाराबरोबर करार करणे आवश्यक होते. बोलीदार रुपये ११९ कोटी (इसारा रकमेचे समायोजन केल्यानंतर रुपये एक कोटी) करार करण्याच्या तारखेपासून २ महिन्याच्या आंत सुरु होणा-या ६ हप्त्यात (प्रत्येकी रुपये १२ कोटीचे २ हप्ते व उरलेली रक्कम ४ समान हप्त्यात) प्रदान करण्यास बांधिल होता. स्विकृत किंमत वेळेवर मिळण्याची खात्री करून घेऊन करार लवकर करणे कंपनीच्या वित्तीय हिताचे होते. परंतु, ८ महिन्यापेक्षा जास्त विलंबनानंतर ३० ऑक्टोबर २००७ ला करार करण्यात आला होता. त्याची परिणीती रुयये ६.९४ कोटीच्या व्याजाच्या (मुदत बंद ठेवीवर लागू ८.७५ टक्के व्याजाच्या दरानुसार) हानीत झाली होती. विलंब प्रामुख्याने प्रशासकीय कारणामुळे झाला होता असे विधी सल्लागाराची मान्यता प्रलंबित कामाचे उशिरा केलेले मापन, बोलीदारांचा नवीन नामांकन अंगिकार करण्याचा निर्णय, बोलीदारांना आवश्यक असलेल्या दस्ताऐवजाचे हस्तांतरण इत्यादी यामुळे झाला होता.

व्यवस्थापनाने त्यांच्या उत्तरात (जुलै २००८) ज्यांची शासनाने पुष्टी केली होती (डिसेंबर २००८) असे म्हटले होते की, संस्थापन लेख व नियमावलीनुसार संचालक मंडळाची अधिस्तिकृती आवश्यक होती व संचालक मंडळाने सप्टेंबर, २००७ मध्ये स्विकृती दिल्यानंतरच लगेच करार करण्यात आला हे उत्तर पटण्यायोग्य नाही. कारण, की कंपनीने संचालक मंडळाची अधिस्विकृती देकाराची स्वीकृती (जानेवारी २००७) मिळाल्याबरोबर त्वरीत करावयास हवी होती आणि करार निर्विष्ट वेळेत करावयास हवा होता.

**७.२** यांप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले की, ऑक्टोबर, २००६ मध्ये संचालक मंडळाने तीन संचालकांची उपसमिती नेमून त्या समितीला उच्चतम बोलीधारक (मे.मंत्री ग्रुप) बरोबर वाटाघाटी करून त्यानी दिलेली बोली २००६ च्या सिद्ध गणकात दिलेल्या दराप्रमाणे येणा-या किमतीपर्यंत वाढविण्यास तयार असेल तर निविदा स्तिकृतीचा विचार करण्यास हरकत नाही असे ठरविले. त्याप्रमाणे वाटाघाटी झाल्या व सदर मे. मंत्री ग्रुपने बोली वाढविण्याचे मान्य केले व त्यास मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष यांची मान्यता रितसरपणे घेतली व तद्नंतर जरी स्वीकृतीपत्र कंपनीचे अध्यक्ष व मा. मुख्यमंत्री यांच्या मान्यतेने दिले असले तरी विक्रीजन्य गाळे ही कंपनीची मत्ता आहे त्यांच्या विक्रीसाठीची अंतिम मान्यता संचालक मंडळाची लागते त्याशिवाय करारनामा करता येत नाही म्हणून मध्यंतरातला कालावधी हा अपरिहार्य होता म्हणून लेखापरीक्षकाने दाखविलेले विक्री किंमतीवर आधारीत उपर्जित (व्याज) नुकसान केवळ काल्पनिक आहे प्रत्यक्ष नाही. (प्रसंगावशात, मे. मंत्री ग्रुपने विक्रीच्या पूर्ण रकमेचा भरणा कंपनीला पूर्वकालीन २००८ च्या मध्यावधीत केला आहे. परंतु त्यांच्या बहुतांश सदनिका मात्र अजून विकायच्या राहिल्या आहेत.)

**७.३ :** महामंडळाने व्यक्त केलेल्या अभिप्रायाशी शासनाने कुठलेही अभिप्राय नोंदविले नाहीत.



**७.४ :** याप्रकरणी गृहनिर्माण विभाग व शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने ६ जुलै २०११ रोजी गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव तसेच झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली. "वसुलीच्या दिरंगाईमुळे व्याजाची झालेली हानी" याची वस्तुस्थिती विषद करताना विभागीय सचिव यांनी सांगितले की, याबाबत गाळे विक्री करण्याबाबतचा जो निर्णय आहे त्यास संचालक मंडळाची मान्यता आवश्यक होती संचालक मंडळाचा निर्णय होण्यास आठ महिन्याचा कालावधी लागला याबाबत बैठक आयोजित करण्यासाठी बराच पाठपुरावा केला तद्नंतर जेव्हा बैठक घेण्यात आली त्यावेळी पाच वर्षाचे सर्व लेखे एकत्रित करून बैठक आयोजित केली होती. संचालक मंडळाच्या एकदरीत किती बैठका व्हावयास पाहिजेत या समितीप्रमुखांच्या विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, एक वर्षाच्या कालावधीमध्ये चार बैठका होणे अपेक्षित आहेत. परंतु, प्रत्यक्षात चार वर्षाच्या कालावधीमध्ये एकच बैठक झाली आहे. असे स्पष्ट केले. यावर समिती प्रमुखांनी विचारले की, जर संचालक मंडळाची बैठक वेळेवर होत नसेल तर निर्णय घेण्याच्या बाबतीत अनियमितता येते. ही बाब गंभीर आहे. विभागाकडील कामाचे स्वरुप व व्याप्ती लक्षात घेता लहान सहान प्रकरणाबाबत लवकर निर्णय झाले पाहिजेत व त्यावर निर्णय घेण्यासाठी बैठक होणे गरजेचे आहे. यासाठी आवश्यक वाटल्यास प्रकल्पाच्या उपाध्यक्षांना काही बाबींमध्ये निर्णय घेण्याची मुभा देण्यात यावी. व त्यांच्या अध्यक्षतेखाली बैठकी आयोजित कराव्यात धोरणात्मक निर्णय घेताना अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन निर्णय करावा. अशी सूचना केली. त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, समितीमध्ये केलेल्या सुचनेनुसार सदर प्रस्ताव संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करु असे सांगितले. विकासकाबरोबर कराकरण्यापूर्वी संचालकमंडळाची बैठक घेणे व घेतलेल्या निर्णयाच्या ठराव क्रमांकानुसार ते निश्चित करणे आवश्यक असते असे शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाच्या कंपनी सचिवांनी साक्षीच्या शेवटी सांगितले.

**७.५ अभिप्राय व शिफारशी :**

**शिवशाही पुनर्वसन प्रकल्पामार्फत दिंडोशी व मालाड येथे एस.आर.ए. योजनेखाली बांधलेल्या गाळ्यांचे विक्री करताना विकासकांनी ९० % बांधकाम पुर्ण केले होते. विकासकाने काही प्रकरणी दावा दाखल केल्यानंतर त्यास कंपनीने मान्यता न दिल्याने कंत्राटदारांनी उरलेले काम पुर्ण करण्यास नकार दिला. त्यामुळे शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाने जानेवारी, २००६ मध्ये ज्या स्थितीत सदनिका आहेत त्या स्थितीमध्ये विक्री करण्याचा निर्णय घेतला व त्यासाठी निविदादेखील मागविल्या होत्या. त्यानुसार सर्वोच्च बोलीदार असलेल्या देकराराला विक्री करण्यासाठी सदनिका देण्याच्या प्रस्तावास संचालक मंडळाची मान्यता घेण्याची आवश्यकता होती. परंतु, जवळ-जवळ चार वर्षाच्या कालावधीमध्ये संचालक मंडळाची बैठकच झाली नाही. त्यामुळे उपरोक्त प्रस्तावास मंजूरी मिळण्यास विलंब लागला. ही वस्तुस्थिती समितीला साक्षीच्या वेळी निदर्शनास आली. याकरीता समिती अशी शिफारस करते की, बांधकाम करावयाच्या कामाबाबत कालानुरुप सातत्याने खर्चाच्या किमतीत वाढ होत असते. यासाठी ठराविक कालावधीमध्ये निर्णय होणे आवश्यक असते. याकरिता संचालक**

**मंडळाच्या बैठकीस काही अपरिहार्य कारणामुळे विलंब होत असल्यास काही लहान सहान प्रकरणावर निर्णय घेण्याचे अधिकार प्रकल्पाच्या उपाध्यक्षांना देण्यात यावेत व धोरणात्मक निर्णय मात्र पुनर्वसन प्रकल्पाच्या अध्यक्षांच्या होणा-या बैठकीत घेण्यात यावेत. जेणेकरुन आर्थिक बाबीचे नुकसान न होता प्रकल्पाबाबत असलेले निर्णय वेळेमध्ये होतील अशी समिती शिफारस करते. याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी.**

**आठ : एसआर योजनांच्या अंमलबजावणीत कंपनीची भूमिका**

८.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक २ मधील परिच्छेद क्रमांक २.२.२९ मध्ये "एसआर योजनांच्या अंमलबजावणीत कंपनीची भुमिका" यासंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, मुंबई प्रदेशातील झोपडपट्टी प्रकल्प बाधितांना गाळे पुरवण्यासाठी असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन कार्यक्रमाचा वेग आणखी गतिमान करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने कंपनीची स्थापना केली. कंपनीने १०६७३ गाळयांचे बांधकाम हाती घेतले होते. (१९९८-९९) त्यापैकी ७६४९ गाळे बांधून पूर्ण झाले होते. कंपनीने ६७१५ गाळयांचे वाटप/विक्री केली होती आणि उरलेल्या ९३४ गाळयांचे वाटप/विक्री अजून झाली नव्हती (मार्च २००८) लेखापरिक्षेला असे आढळून आले की, (एसआरए) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण नियमितपणे झोपडपट्टी पुनर्वसन एसआर योजना मंजूर करते. एसआरएने खाजगी व शासकीय संस्थांना ११८४ योजना (२.८१ लाख गाळे) आतापर्यंत (ऑक्टोबर २००८) मंजूर केल्या कंपनीने वर्ष १९९८-९९ नंतर एकही योजना हाती घेतली नव्हती. म्हणून झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत कंपनीची भूमिका किरकोळ राहिली होती. सध्या कंपनीच्या हातात फक्त ३ कार्यरत योजना आहेत. कंपनीच्या तसेच खाजगी विकासकाच्या कामकाजाचे मुल्यांकन करण्यासाठी शासनाने परिव्यय लाख विश्लेषण केले नव्हते. आणि कंपनीच्या अस्तित्वासंबंधी विचारपूर्वक निर्णय सद्धा घेतला नव्हता.

८.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले की, कंपनीने हाती घेतलेल्या १०६७३ गाळयांपैकी जून, २०१० अखेर ८९५८ गाळे पूर्ण केले असून त्यापैकी ७२८६ गाळयांचे वितरण केलेले आहे.

लेखापरिक्षकांने ९३४ गाळयांचे वाटप अजून झाले नव्हते (मार्च २००८) याबाबत कंपनीचे अभिप्राय परिच्छेद क्र. २.२.२३ मध्ये देण्यात आलेली आहेत. कंपनीचे अधिकारी नवीन प्रकल्प हाती घेण्यासाठी प्रयत्नशील आहेत. पण विकासकांकडून अपेक्षित तत्परता व प्रतिसाद मिळत नाही. कंपनीच्या संस्थापन शासन आदेशाप्रमाणे कंपनीने शासनाने दिलेल्या व शासनातर्फे शासकीय अभिकरण संस्थेने दिलेल्या जमिनीवर प्रकल्प राबवायचे आहेत. कंपनीने राबविलेल्या झो.पु.योजनांचा समावेश लेखापरिक्षक यानी दर्शविलेला झोपुप्राच्या आतापर्यंतच्या एकूण योजनांमध्ये समावेश आहे. सन १९९९ नंतर तशा जमिनीवर प्रकल्प राबविण्यास प्राप्त झाला नाही व कंपनी राहिलेली कामे ३-४ महिन्यात पूर्ण करील.

कंपनीचे अस्तित्व पुढेही चालू रहावे याबाबतीत शासनस्तरावर विचारविनियम चालू आहे.

८.३ महामंडळाने व्यक्त केलेल्या अभिप्रायाशी शासनाने कुठलेही अभिप्राय नोंदविले नाहीत.



८.४ याप्रकरणी गृहनिर्माण विभाग व शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने ६ जुलै, २०११ रोजी गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव तसेच झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली. मुंबई प्रदेशातील झोपडपट्टीधारक/प्रकल्पबाधितांना गाळे पुरविण्यासाठी असलेल्या झोपडपट्टी "पुनर्वसन कार्यक्रमाच्या योजनांची अंमलबजावणीत पुनर्वसन प्रकल्पाची भूमिका" या शीर्षकाखाली महालेखाकार यांनी नोंदविलेल्या आक्षेपाबाबत वस्तुस्थिती स्पष्ट करतांना विभागीय सचिवांनी सांगितले की, झोपडपट्टी पुनर्वसनाच्या कामाला प्राथम्य दयावयाच्या शासनाच्या त्यावेळच्या धोरणाला अनुसरुन महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाच्या कार्यप्रणालीहून स्वतंत्र अशी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित कंपनी सन १९९८ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या अधिपत्याखाली स्थापन करण्यात आली होती. ज्या ठिकाणी विकासकांचा जास्त फायदा नसेल व विकासास सी.आर.झेड.चा अडथळा येत असेल अशा ठिकाणी खाजगी विकासक काम करण्यासाठी पुढे येत नव्हते. म्हणून त्यावेळी लोकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय कंपनी म्हणून विकासाचे काम करावे अशी कल्पना पुढे आली होती. व ती रास्त देखील होती. याचे कारण असे की, जमिनीच्या बाजारातील किमतीमध्ये वाढ होत असतांना सुध्दा शासनाने याबाबतीत आपली धोरणात्मक भूमिका घेऊ नये हे योग्य झाले नसते. यापुढे देखिल शिवशाही पुनर्वसन प्रकल्पामार्फत अशा योजना हाताशी घेऊन काम करण्याचे ठरविले असून, तसा प्रस्ताव संचालक मंडळाच्या बैठकीत सादर केला असता त्यावर चर्चा देखील झाली आहे. जानेवारी, २०११ पासुन ज्या सीआरझेड अंतर्गत झोपडपट्टी आहेत, त्याठिकाणी खाजगी विकासकांबरोबर ५१ % भागीदारीमध्ये प्रकल्प झाले पाहिजेत अशी केंद्र शासनाने अट घातली आहेत. अशा प्रकारच्या प्रकल्पातून जर घरे निर्माण झाली तर ती सर्वसामान्य लोकांना परवडणारी तर असतीलच शिवाय त्यामध्ये लोकांची फसवणूक देखील होणार नाही. हे काम अत्यंत क्लेशकारक असल्याने खाजगी विकासकांना ज्या पद्धतीने काम करणे शक्य असते त्या पद्धतीने शासकीय कंपनी म्हणून काम करणे आपल्याला अवघड असते याचा विचार करणे गरजेचे आहे असे वाटते. एकंदरीत शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित कंपनी ही आर्थिक परिस्थितीमध्ये तूट मिळत असली तरी सद्यःस्थितीमध्ये कंपनी २०० कोटी रुपयाच्या नफ्यामध्ये आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी, पुर्नवसन प्रकल्प यांनी एका प्रश्नाच्या उत्तरादाखल सांगितले. सद्यःस्थितीत असलेल्या नफ्यामुळे कंपनीने प्रथमच विभागणी (डिव्हीडंड) घोषित केलेली आहे. त्यानुसार प्रस्ताव संचालक मंडळाच्या बैठकीसमोर सादर करण्याची प्रक्रिया सुरु आहे असेही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढील प्रश्नाला उत्तर देताना नमूद केले. शासनाकडून ६०० कोटी रुपयांचा निधी भाग भांडवल म्हणून शिवशाही प्रकल्पाला दयावयाचा होता परंतु प्रत्यक्षात शासनाने फक्त ११५ कोटी रुपयेच भाग भांडवल म्हणून पुनर्वसन प्रकल्पाला दिलेले आहेत. तरी देखील कंपनीकडून विभागणी देण्याचा प्रस्ताव झालेला आहे असे विभागीय सचिवांनी एका प्रश्नाच्या उत्तरादाखल स्पष्ट केले आहे. कंपनीचे सचिव यांनी बैठकीच्या शेवटी असे सांगितले की, सन २०१०-२०११ या वर्षासाठी कंपनीकडून विभागणी ५ % देण्याचे घोषित केलेले आहे.

८.५ अभिप्राय व शिफारशी :

मुंबई प्रदेशातील झोपडपट्टी/प्रकल्पबाधितांना निवासी गाळे पुरविण्यासाठी स्थापित करण्यात आलेल्या शिवशाही पुनर्वसन प्रकल्पामुळे झोपडपट्टी पुनर्वसनाच्या कार्यक्रमास प्रस्तावित केल्यानुसार शासनाने कंपनी निर्माण केल्यामुळे गतिमानता आली होती. हे समिती समोरील आलेल्या साक्षी पुराव्यावरुन स्पष्ट होते. पुनर्वसन प्रकल्पामार्फत हाती घेतलेल्या १०६७३ निवाशी गाळयांपैकी जून, २०१० अखेरपर्यंत ८९५८ गाळे पूर्ण करून त्यातील ७२८६ गाळयांचे वितरण देखील करण्यात आले होते. शिवशाही पुनर्वसन प्रकल्पातून सन १९९८-९९ नंतर एकही नवीन योजना हाती घेतलेली नव्हती व त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत कंपनीची भूमिका किरकोळ राहिली होती. हा महालेखाकारांनी आक्षेप घेतला असला तरी पुनर्वसन प्रकल्पासमोरील प्रथम हाती घेतलेल्या योजना अल्पावधीत पूर्ण करण्यासाठी कंपनीकडून करण्यात आलेली कार्यवाही समितीला निश्चितच उल्लेखनिय वाटते. याचे कारण समितीला दिलेल्या माहितीनुसार कंपनीला झालेला आर्थिक नफा व त्यामधून सन २०१०-२०११ साठी जाहिर केलेली विभागणी (डिव्हीडंड) तसेच शासनाला देखील प्रत्यक्ष दयावयाच्या भाग भांडवलापैकी कमी भाग भांडवल देऊन झोपडपट्टीवाशींयांना मोफत घरे उपलब्ध करून देण्यामध्ये शासनाच्या धोरणाला आलेले यश धावरून दिसून येते. केंद्र शासनाने सीआरझेड अंतर्गत झोपडपट्टी योजनेच्या विकासाकरिता कंपनीने खाजगी विकासकाबरोबर ५१% भागीदारीमध्ये प्रकल्प राबविण्याची घातलेली अट ही देखिल त्याची फलनिष्पत्ती होऊ शकते. याकरिता संचालक मंडळासमोर अशा प्रकारच्या योजनेमध्ये भाग घेऊन काम करण्यासाठी विचारार्थ असलेल्या प्रस्तावावर मागील काळातील अनुभव लक्षात घेऊनू निर्णय घ्यावा अशी शिफारस करीत आहे. याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी.

# बैठकींचे परिशिष्ट

**मंगळवार, दिनांक १४ जून २०११, विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री. सदाशिवराव हणमंतराव पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. मधु चव्हाण, वि.स.स
३. डॉ. कल्याण काळे, वि.स.स.
४. श्री. सुभाष रामचंद्र घोटे, वि.स.स.
५. श्री. विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.
६. श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.
७. श्री. हनुमंत जगन्नाथ डोळस, वि.स.स.
८. श्री. प्रमोद जठार, वि.स.स.
९. श्री. राजन विचारे, वि.स.स.
१०. श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
११. श्री. चरणसिंग सप्रा, वि.प.स.
१२. श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्री. सुभाषचंद्र मयेकर, उप सचिव
२. श्री. सुधीर वळवी, अवर सचिव (समिती)

**महालेखाकार (वाणिज्यिक) मुंबई यांचे कार्यालय :**

१. श्री. एस. जी. नायक,
उपमहालेखाकार (वाणिज्यिक लेखा)
२. श्री. पी. पी. लोणकर, वरीष्ठ लेखाधिकारी

**परिवहन विभाग, मंत्रालय, मंबई :**

श्री. शैलेशकुमार शर्मा, प्रधान सचिव

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ :**

१. श्री. दिपक कपूर, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक
२. श्री. कुमार माने, महाव्यवस्थापक (भां. व ख.)
३. श्री. व्ही. बी. गायधनी, महाव्यवस्थापक (यं. अ.)
४. श्री. रवींद्र धोंगडे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या वाणिज्यिक अहवालातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ६ जुलै २०११, विधान भवन, मुंबई

उपस्थिती :

१. श्री. सदाशिवराव हणमंतराव पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. अण्णा ऊर्फ मधु चव्हाण, वि.स.स

३. श्री. विवेकानंद शंकर पाटील, वि.स.स.

४. श्री. विक्रमसिंह रणजितसिंह पाटणकर, वि.स.स.

५. श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.

६. श्री. बदामराव लहुराव पंडित, वि.स.स.

७. श्री. प्रमोद शांताराम जठार, वि.स.स.

८. श्री. हेमंत टकले, वि.प.स.

९. श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. सुधीर वळवी, अवर सचिव (समिती)

**महालेखाकार (वाणिज्यिक) मुंबई यांचे कार्यालय :**

(१) श्री. एस. जी. नायक,

उपमहालेखाकार (वाणिज्यिक लेखा)

(२) श्री. एस. व्ही. खेडकर, वरीष्ठ लेखाधिकारी

**गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मंबई :**

श्री. गौतम चटर्जी, प्रधान सचिव

**शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित महामंडळ :**

१. श्री. एस. बी. म्हात्रे, कंपनी सचिव

२. श्री. डी. आर. हडदरे, मुख्य अभियंता

३. श्री. आर. बी. संख्ये, उप अभियंता

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या वाणिज्यिक अहवालातील शिवशाही पुर्नवसन प्रकल्प मर्यादित महामंडळाच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.



सोमवार, दिनांक ८ ऑगस्ट २०११ विधान भवन, मुंबई

उपस्थिती :

१. श्री. सदाशिवराव हणमंतराव पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. अण्णा ऊर्फ मधु चव्हाण, वि.स.स.

३. श्री. रमेश आनंदराव बागवे, वि.स.स.

४. श्री. सुभाष रामचंद्रराव धोटे, वि.स.स.

५. श्री. विवेकानंद शंकर पाटील, वि.स.स.

६. श्री. विक्रमसिंह रणजितसिंह पाटणकर, वि.स.स.

७. श्री. हनुमंत जगन्नाथ डोळस, वि.स.स.

८. श्री. बदामराव लहुराव पंडित, वि.स.स.

९. श्री. सुरेश बापूरावजी देशमुख, वि.स.स.

१०. श्री. जयकुमारभाऊ जितेंद्रसिंह रावल, वि.स.स.

११. श्री. अतुल देविदास देशकर, वि.स.स.

१२. श्री. विजयकुमार सिद्रामप्पा देशमुख, वि.स.स.

१३. श्री. प्रमोद शांताराम जठार, वि.स.स.

१४. श्री. राजन विचारे, वि.स.स.

१५. श्री. प्रताप बाबुराव सरनाईक, वि.स.स.

१६. श्री. महादेव रामचंद्र बाबर, वि.स.स.

१७. श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.

१८. श्री. चरणसिंग सप्रा, वि.प.स.

१९. श्री. संजय केळकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. सुधीर वळवी, अवर सचिव (समिती)

समितीने प्रारुप अहवालाच्या मसुद्यावर विचारविनिमय करून तो काही सुधारणांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई